या नरक चतुर्दशी दिवशी तुमच्या सर्व दु:खांचा व दृष्ट विचारांचा नाश होवो हीच सदिच्छा

नरक चतुर्दशी

सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

दैनिक

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

www.rashtrasahyadri.com

• संपादक : काकासाहेब नवले • RNI No. MAHMAR /2019/82605 • वर्ष ७ वे • अंक १३ • सोमवार, २० ऑक्टोबर २०२५ • पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 • पाने ८ • मूल्य रु. ४.००

## महाराष्ट्रात ९६ लाख खोटे मतदार...



'मला खात्रीलायकरित्या समजलेली गोष्ट सांगतो, १ जुलैला त्यांनी मतदार यादी बंद करून टाकली. जवळपास ९६ लाख खोटे मतदार महाराष्ट्राच्या यादीमध्ये भरले आहेत. यामध्ये मुंबईत ८.३०-१० लाख, ठाणे, पुणे, नाशिक असे प्रत्येक शहरात आणि गावांमध्ये भरलेले आहे. देशात अशा निवडणुका होणार असतील तर कशासाठी निवडणूक लढायच्या, प्रचार करायचा, पैसे खर्च करायचे. अशा निवडणूका होत असतील तर महाराष्ट्र सह देशातील मतदारांचा अपमान आहे. तुम्ही मतदान करा अथवा नका करू मॅच फिक्स आहे. नंतर बोलायचं यांचा एकही आमदार खासदार निवडून नाही आला, अस केलं तर कसा येईल? – **राज ठाकरे, मनसे**

### झापुक | zupuk

दिवाळी आली की
अन्न भेसळ वाल्यांना
येते जाग
भेसळ उघड
करण्यासाठी होते
भागमभाग
वर्षभर भेसळीवर
लक्ष्मीची कृपा
असते
त्यामुळे कोणालाही
भेसळ सापडत
नसते

**नवनाथ कुताळ, 9422231825**

### महत्वाचे...

## २० वर्षानंतरच्या वाहनांसाठी पुर्ननोंदणी शुल्क दुपटीने वाढवले

**पुणे** : शासनाने २० वर्षानंतरच्या वाहनांसाठी पुनर्नोंदणी शुल्क वाढवले आहेत. तसेच त्या व्यतरिक्त पर्यावरण शुल्कही पुनर्नोंदणी वेळी आकारले जातात.१५ वर्षानंतर पुनर्नोंदणीसाठी उशीर केल्यास दंड आकारला जातो. दुचाकी वाहनांसाठी दरमहा ३०० रुपये आणि चारचाकी वाहनांसाठी ५०० रुपये दंड लागणार आहे. त्यात आता २० वर्षानंतर पुनर्नोंदणीसाठी दुपटीने शुल्क वाढविले आहेत. मोटार वाहन कायद्यानुसार १५ वर्षांनंतर वाहनांची पुनर्नोंदणी अनिवार्य आहे. केंद्र सरकारने या कायद्यात बदल केला असून २० वर्षांपेक्षा जुन्या वाहनांसाठी प्रमाणपत्र नूतनीकरणासाठी दुप्पट शुल्क केले आहेत. १५ वर्षानंतरच्या वाहनांची पुनर्नोंदणी ५ वर्षासाठी ग्राह्य असते. वाहनाचा फिटनेस असेल तर पुढील ५ वर्षांसाठी पुनर्नोंदणी करता येते.

# खोटा रिपोर्ट, चुकीचे उपचार अन् मृतदेह गायब

# पाच डॉक्टरांवर गुन्हा

## उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक आदेश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर : कोरोना काळात एका वृद्ध रुग्णाचा बनावट कोरोना रिपोर्ट तयार करून त्याच्यावर चुकीचे उपचार करण्यात आले आणि मृत्यूनंतर मृतदेहाची परस्पर विल्हेवाट लावण्यात आली, असा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात तब्बल पाच वर्षांपासून न्यायासाठी लढा देणाऱ्या फिर्यादीच्या पाठपुराव्यानंतर अखेर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने याची गंभीर दखल घेत, अहिल्यानगर शहरातील पाच नामवंत डॉक्टरांसह एका अज्ञात कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणामुळे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.**



फिर्यादी अशोक बबनराव खोकराळे (वय ४७, रा. सावेडी, नगर) यांनी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे वडील बबनराव खोकराळे (वय ७९) यांना १३ ऑगस्ट २०२० रोजी घशात खवखव व बद्धकोष्ठतेचा त्रास होता. त्यानंतर त्यांना डॉ. सचिन पांडुळे यांच्या पटियाला हाऊस येथील कोविड सेंटरमध्ये दाखल करण्यात आले. सर्व वैद्यकीय तपासण्या नॉर्मल आल्या असतानाही त्यांना निरीक्षणाखाली ठेवण्यात आले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी, म्हणजे १४ ऑगस्ट रोजी, कोणतीही पूर्वसूचना न देता रुग्णाला न्युक्लिअस हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले.

न्युक्लिअस हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यानंतर बबनराव खोकराळे यांनी आपल्या मुलांना फोन करून मदतीची विनवणी केली. हे लोक मला मारून टाकतील, मला बेडला बांधून ठेवले आहे, खूप रक्त काढले, मला इथून घेऊन जा, असे त्यांनी सांगितले. ही माहिती मिळताच फिर्यादी अशोक खोकराळे तातडीने हॉस्पिटलमध्ये गेले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना भेट न देता रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह असल्याचे सांगून टाळाटाळ केली.

१८ ऑगस्ट २०२० रोजी बबनराव खोकराळे यांच्या मृत्यूची माहिती फिर्यादीला देण्यात आली. हॉस्पिटलने १ लाख ८४ हजार रुपयांचे बिल भरावे लागेल, असे सांगून पैसे घेतले गेले. मात्र बिल भरल्यानंतरही मृतदेह मिळाला नाही. हॉस्पिटलने मृतदेह सिव्हिल हॉस्पिटलला पाठविल्याचे सांगितले. मात्र, फिर्यादीने सिव्हिल हॉस्पिटल, अमरधाम व अन्य संबंधित ठिकाणी मृतदेहाची शोधाशोध केली, तरीही मृतदेह कुठेही आढळला नाही.

याप्रकरणी फिर्यादीने न्यायासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली. जिल्हा शल्यचिकित्सकांनी **(पान ४ वर)**

# १ नोव्हेंबरला निवडणूक आयोगाविरोधात मुंबईत विराट मोर्चा



**मुंबई** : येत्या १ नोव्हेंबरला महाराष्ट्रातील सर्व विरोधी पक्षांचा निवडणूक आयोगाच्या विरोधात मुंबईत विराट मोर्चा निघेल, अशी घोषणा शिवसेना खासदार संजय राऊत यांनी महाविकास आघाडीच्या वतीने केली.शिवसेना उबाठाचे खासदार संजय राऊत, मनसे नेते बाळा नांदगावकर, राष्ट्रवादी एसपीचे नेते जयंत पाटील, मनसे नेते नितीन सरदेसाई, मनसे नेते संदीप देशपांडे, काँग्रेस नेते सचिन सावंत यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेत्यांची आज मुंबईत दादरच्या शिवसेना भवन येथे पत्रकार परिषद पार पडली. निवडणूक स्वच्छ, पारदर्शक असायला हवी यासाठी महाराष्ट्रातील सर्व प्रमुख प्रादेशिक पक्ष (सत्ताधारी वगळून) लढत आहेत. दोन दिवस सातत्याने निवडणूक आयोगाकडे बैठका झाल्या. त्या बैठकांमध्ये सर्व पक्षांचे प्रमुख नेते होते. आमच्या प्रमुख नेत्यांनी बैठकीत जे मुद्दे मांडले ते निवडणूक आयोग मानायला तयार नाही. निवडणूक आयोगाने गुन्हेगारी स्वरुपाचं कृत्य केलं आहे. ते ऐकत नसल्याने सर्वांचं एकमत झालं आहे, त्यांना रस्त्यावर उतरुन दणका द्यावा लागेल, असा इशारा राऊतांनी दिला.येत्या १ नोव्हेंबरला शनिवारी निवडणूक आयोगाच्या या मनमानी आणि भ्रष्ट कारभारा विरुद्ध मुंबईत सर्वपक्षीय विराट मोर्चा निघेल. महाराष्ट्राच्या गावागावातून, जिल्ह्या-जिल्ह्यातून मतदानाचा अधिकार गमावलेले लाखो लोक इथे येतील आणि मतदारांची ताकद देशाचे पंतप्रधान, गृहमंत्री आणि निवडणूक आयोगाला **(पान ४ वर)**

# कर्णधार सूर्यकुमार यादव साईदरबारी!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : भारतीय क्रिकेट संघाचा खेळाडू तसेच टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने रविवारी आपल्या परिवारासह शिर्डीत पोहचून साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. आशिया कप क्रिकेट स्पर्धेत पाकिस्तानला नमून पहेलगाम हल्ल्यातील मृतांना आदरांजली अर्पण करण्याची संधी मिळाल्याबद्दल साईबाबांचे आभार मानण्यासाठी आलो असल्याची भावना सूर्यकुमार याने व्यक्त केली.



आशिया कपमध्ये सूर्यकुमार यादव याच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघाने पाकिस्तानला नाम वून फायनल जिंकली होती. त्यानंतर आता भारत आणि ऑस्ट्रेलियामध्ये वन डे मालिका सुरू आहे. त्यानंतर टी-२० मालिका असणार आहे. दरम्यान, सूर्या दिवाळीत सूर्या साईबाबांच्या दर्शनासाठी सहपरिवारासह आला आहे. **(पान ४ वर)**

> मी साईबाबांचे आभार मानण्यासाठी येथे सहपरिवार आलो आहे. साईबाबांनी सदैव सर्वांवर कृपा ठेवावी. देशवासीयांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...
>
> – **सूर्यकुमार यादव**

# काष्टी हादरलं! किरकोळ कारणावरून पितापुत्राकडून खून; एक जेरबंद, एक फरार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : तालुक्याची राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काष्टी गावात पुन्हा एकदा रक्तरंजित घटना घडली आहे. किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून पितापुत्राने संगनमताने लाकडी दांडक्याने मारहाण करून एका ज्येष्ठ नागरिकाचा खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी श्रीगोंदा पोलिसांनी एका आरोपीस अटक केली असून दुसरा फरार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिवाजी विठ्ठल वाघ (वय ७१, रा. वाघवस्ती, काष्टी रेल्वे स्टेशन) हे आपल्या घरी असताना त्यांचे शेजारी व नातेवाईक विशाल राजु वाघ व राजु विठ्ठल वाघ यांनी किरकोळ वादातून लाकडी बांबूने बेदम मारहाण केली. यात गंभीर जखमी झालेल्या शिवाजी वाघ यांना प्रथम डॉ. पांडुरंग दातीर यांच्या रुग्णालयात, नंतर दौड येथील पिरॅमिड हॉस्पिटलमध्ये आणि शेवटी पुण्यातील ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान १७ ऑक्टोबर रोजी त्यांचे निधन झाले. फिर्यादी दीपक शिवाजी वाघ (वय ३५) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १३ ऑक्टोबर रोजी दुपारी ही घटना घडली. दारूच्या नशेत असलेल्या विशाल वाघला दारू प्यालास, **(पान ४ वर)**

# भाजपचे प्रकाश चित्ते शिंदेच्या शिवसेनेत

## राजकीय समीकरण बदललेले : नगरपालिकेत भाजपला आव्हान देणार



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : भारतीय जनता पार्टीतील जुना चेहरा आणि प्रदेश ओबीसी सेलचे माजी उपाध्यक्ष प्रकाश चित्ते यांनी कार्यकर्त्यांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला **(पान ४ वर)**

### • शिवसेनेचा स्वतंत्र पॅनल?

श्रीरामपूर नगरपालिका निवडणुकीत माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या नेतृत्वाखाली शिंदे गट स्वतंत्र पॅनल उभे करणार आहे. यात प्रकाश चित्ते यांना नगराध्यक्षपदासाठी उमेदवार म्हणून पाठिंबा देण्याची शक्यता जवळजवळ निश्चित मानली जात आहे. हा पॅनल भाजपशी युती न करता स्वतंत्र लढणार असल्याने स्थानिक राजकारणात नवीन वळण येईल.

### • बेग यांच्या भूमिकेबाबत उत्सुकता

गेल्या विधानसभा निवडणुकीनंतर श्रीराम सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष सागर बेग हेही शिंदे गटात सामील झाले होते. मात्र, हिंदुत्ववादी संघटनांमध्ये चित्ते आणि बेग हे एकमेकांचे कट्टर विरोधक आहेत. पक्षाकडून या भांडणाबाबत अद्याप कोणताही निर्णय घेतला गेलेला नाही. पॅनलमध्ये बेग यांना काय स्थान मिळेल, याबाबत उत्सुकता आहे. पक्षातील अंतर्गत समन्वय कसा राहील, हे निवडणुकीचे निकाल ठरवेल, यात शंका नाही.


ONKAR SAKHAR KARKHANA Pvt.Ltd.

शुभ दिपावली

गौरी शुगर अ‍ॅण्ड डिस्टिलरीज प्रा.लि.
हिरडगाव, ता.श्रीगोंदा

ऊसाचा भाव ३१०१ रु प्रति टन
ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना मोफत साखर

सर्व शेतकरी, ऊस वाहतुकदार, ऊस तोडणी मजुर, व्यापारी व विविध क्षेत्रातील नागरीक, अधिकारी यांचे जीवन प्रकाशमान होवो आपणास दिपावली निमित्त

मन:पुर्वक शुभेच्छा..!



मा. श्री. बाबुराव बोत्रेपाटील
चेअरमन - ओंकार साखर कारखाना प्रा. लि. युनिट नं. - 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16
मार्गदर्शक - अशोक नागरी सह. बँक लि . पिंपरी, पुणे






1827 Jewels
चंदुकाका सराफ ज्वेल्स

सोन्याची चमक उत्सवाचा धमाका

जुन्या सोन्यावर ₹2000/- चा एक्सचेंज बोनस (प्रति 10 ग्रॅम)

यासोबतच 2BHK FLAT! मिळविण्याची सुवर्णसंधी!

फ्लॅट 40% सूट* सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर

0% मजुरी हिऱ्यांच्या दागिन्यांवर*

UP TO ₹4,000 EXTRA CASHBACK# SBI card

#Min. Trxn.: ₹45,000; Max. Cashback: ₹4,000 per card account; Validity: 17 Oct - 23 Oct 2025. T&C Apply.

*अटी लागू | ऑफर 26 ऑक्टोबर, 2025 पर्यंत.

नांदेड: महात्मा फुले मार्केट, ITI कॉर्नर | 0796 999 1827

दिवाळी पाडवानिमित्त आमची शाखा सकाळी 9 वाजल्यापासून सुरु राहील

## संपादकीय..

# बोगस मतदार: लोकशाहीचा काळा धबधबा

भारतीय लोकशाहीच्या पायाभूत स्तंभांपैकी एक असलेल्या निवडणुका आता किती खऱ्या आणि किती खोट्या, यावरून एक वेगळीच चर्चा रंगली आहे. सुदृढ लोकशाहीचे प्रतीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रक्रियेत बोगस मतदारांचा घुसखोरीचा मुद्दा आता केवळ राजकीय आरोपांपुरता मर्यादित राहिला नाही, तर तो लोकशाहीच्या खऱ्या अर्थाने अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उभे करणारा ठरला आहे. विशेषतः महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी एकत्र येऊन निवडणूक आयोगावर (ईसीआय) गंभीर आरोप केले आहेत.

९६ लाखांहून अधिक बोगस मतदारांची आकडेवारी मांडत राज ठाकरे, उद्धव ठाकरे, शरद पवार, बाळासाहेब थोरात आणि रोहित पवारांसारख्या नेत्यांनी ईसीआयला आव्हान दिले आहे. संजय राऊत यांच्या नेतृत्वाखालील १ नोव्हेंबरचा मुंबईतील विराट मोर्चा हा मुद्दा आता राष्ट्रीय पातळीवर नेला जाणार आहे. पण हे आरोप फक्त शब्दांत नाहीत; त्यामागे ठोस आकडेवारी आणि पुरावे आहेत. ही बाब दुर्लक्ष करता येणार नाही, कारण बोगस मतदार म्हणजे केवळ आकडेवारीचे खेळ नाही, तर लाखो नागरिकांच्या मताधिकाराचे अपहरण आहे. ईसीआयने राजकीय भूमिका बाजूला ठेवून वस्तुनिष्ठ तपास करावा, अन्यथा लोकशाहीची विश्वासार्हता धोक्यात येईल.या मुद्द्याची सुरुवात राष्ट्रीय राजकारणातून झाली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी २०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये महाराष्ट्रात झालेल्या 'मत चोरी'चे पुरावे सादर केले. त्यांच्या माहितीनुसार, लोकसभा निवडणुकीनंतर (एप्रिल-मे २०२४) आणि विधानसभा निवडणुकीआधी (नोव्हेंबर २०२४) केवळ पाच महिन्यांत महाराष्ट्रात ४० लाख नवीन मतदारांची नोंद झाली. ही संख्या आश्चर्यकारक आहे, कारण २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपासून २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत पाच वर्षांत केवळ ३१ लाख मतदार वाढले होते.

राहुल गांधींनी पत्रकार परिषदेत सादर केलेल्या डेटानुसार, महाराष्ट्रातील एकूण प्रौढ लोकसंख्या ९.५४ कोटी असताना मतदारांची संख्या ९.७ कोटींवर गेली आहे. ही विसंगती कशी शक्य? त्यांनी हेही सांगितले की, भाजपने ज्या ७८ विधानसभा मतदारसंघांत १८ लाख नवीन मतदारांची नोंद केली, त्यापैकी ६८ मध्ये भाजपने विजय मिळवला. हे केवळ संयोग नाही, तर नियोजित 'मत चोरी'चे उदाहरण आहे. त्यांच्या आरोपांना पाठिंबा देण्यासाठी काँग्रेसने डेटा विश्लेषण विभागाची मदत घेतली असून, त्यात फॉर्म ६ चा गैरवापर, दुबार नावे आणि बोगस पत्ते यांचा उल्लेख आहे.

राहुल गांधींच्या या पुराव्यांमुळे ईसीआयवर सुप्रीम कोर्टातही दबाव आला, पण आयोगाने केवळ नकार देऊन टाळाटाळ केली. ही विसंगती केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नाही; कर्नाटकातील महादेवपुरा मतदारसंघात १ लाखांहून अधिक बोगस मतदार सापडले, ज्यात ११,९६५ दुबार नावे, ४०,००९ बोगस पत्ते आणि ३३,६९२ ज्येष्ठ नागरिकांना 'प्रथम मतदार' म्हणून नोंदवले गेले.

हे पुरावे ईसीआयला झोपेतून जागे करायला हवेत.महाराष्ट्राच्या स्थानिक निवडणुकांमध्ये हा मुद्दा आता उफाळून आला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी १९ ऑक्टोबर २०२५ रोजी गोरेगाव येथे मेळाव्यात ९६ लाख बोगस मतदार असल्याचा गंभीर आरोप केला. त्यांच्या माहितीनुसार, मुंबईत ८ ते १० लाख, ठाणे, पुणे आणि नाशिकमध्ये प्रत्येकी ८ ते ८.५ लाख बोगस मतदार घुसवले गेले आहेत. हे केवळ आकडेवारी नाही; प्रत्येक गाव आणि शहरात ५०-१०० नावे एकाच पत्त्यावर नोंदवली जात आहेत. राज ठाकरे म्हणाले, ''हे मतदार यादीतील खेळ आहे. निवडणुका अशा यादीवर घेतल्या जातील तर ते मतदारांचा अपमान आहे.''

त्यांनी ईसीआयला आव्हान देत म्हटले की, यादी स्वच्छ न करता स्थानिक निवडणुका कशा घेणार? हीच आकडेवारी उद्धव ठाकरे, शरद पवार आणि काँग्रेस नेत्यांनी १५ ऑक्टोबरला मुंबईत ईसीआय अधिकाऱ्यांसमोर मांडली. त्यांनी एक कोटी बोगस मतदारांची मागणी करत निवडणुका स्थगित करण्याची मागणी केली. उदाहरणार्थ, नाशिक शहरातील तीन आणि देवळालीतील चार मतदारसंघांत ३,५३,९४९ दुबार, बोगस आणि स्थलांतरित मतदार सापडले. शिवसेना (यूबीटी) च्या 'सामना'त म्हटले आहे की, गुजरातमधील सॉफ्टवेअरचा वापर करून मृत व्यक्तींची नावे वाढवली जात आहेत, तर जिवंतांची काढली जात आहेत. विशिष्ट उदाहरणे सांगितली तर, उदगीर, कमठी आणि नालासोपाऱ्यात एकाच ईपीआयसी नंबरवर अनेक मतदार नोंदवले गेले आहेत. नालासोपाऱ्यात एका महिलेचे नाव सहा वेळा वेगवेगळ्या ईपीआयसी नंबरसह आढळले. राष्ट्रवादी काँग्रेसचे रोहित पवार यांनी १६ ऑक्टोबरला पत्रकार परिषदेत करजत मतदारसंघात 'डोनाल्ड ताट्या ट्रम्प' नावाच्या बोगस व्यक्तीची नोंद दाखवली. त्यांनी बोगस आधार कार्डावर ट्रम्पची फोटोसह नोंद कशी होते हे लाइव्ह डेमो केले. हे फॉर्म ६ चा गैरवापर आहे, ज्याचा उपयोग प्रथम मतदारांसाठी असतो, पण ज्येष्ठ नागरिकांना नवीन मतदार म्हणून नोंदवले जात आहेत.

काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी म्हटले की, विधानसभा निवडणुकीतील यादीत चुका सुधारल्या नाहीत, तर स्थानिक निवडणुकांसाठी तीच यादी वापरली जाणार आहे. जयंत पाटील यांनी ईसीआयचा सर्व्हर बाह्य हस्तक्षेपाने हॅक होत असल्याचा आरोप केला. मुंबईत ६ लाख मतदार काढले आणि २० लाख नवीन नोंदवले गेले, ज्यामुळे १४ लाखांची वाढ झाली. ही वाढ संशयास्पद आहे. या आकडेवारी आणि उदाहरणांमागे एकच उद्देश आहे: सत्ताधारी पक्षांना फायदेशीर ठरविणे. विरोधी पक्षांच्या मते, भाजप आणि शिंदे गटाने ईसीआयवर दबाव टाकून हे साध्य केले आहे. १४ ऑक्टोबरला उद्धव ठाकरे, राज ठाकरे, जयंत पाटील आणि बाळासाहेब थोरात यांनी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे आणि मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकालिंगम यांची भेट घेतली आणि पुरावे सादर केले.

पण ईसीआयने केवळ 'सुरक्षित व्यवस्था' असल्याचे म्हटले, तपासाची ग्वाही दिली नाही. १८ ऑक्टोबरला महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले की, कोणत्याही पक्षाला यादीत हस्तक्षेप करता येत नाही, पण तेही केवळ शब्दांत राहिले. संजय राऊत यांनी १९ ऑक्टोबरला पत्रकार परिषदेत घोषणा केली की, १ नोव्हेंबरला शरद पवार, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत विराट मोर्चा काढला जाईल. लाखो मतदार सहभागी होतील आणि ईसीआयला 'झटका' देण्यात येईल. राऊत म्हणाले, ''हे मैच फिक्सिंग आहे. भाजप प्रथम खेळ रचतो आणि मग निवडणुका लढतो.''हे आरोप राजकीय नाहीत; ते लोकशाहीच्या हाडांमधील मांजरी आहेत. बोगस मतदार घुसवणे म्हणजे लाखो नागरिकांचा मताधिकार चोरणे आहे. नाशिकमधील ३.५ लाख दुबार नावे किंवा मुंबईतील १० लाख बोगस मतदार हे केवळ आकडे नाहीत; ते विश्वासघात आहेत. ईसीआयने डिजिटल यादी आणि सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध करावे, ज्याबाबत राहुल गांधींनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली आहे. स्थानिक निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करायच्या असताना, यादी स्वच्छ न करता पुढे जाणे म्हणजे लोकशाहीचा खेळा घेणे आहे.

विरोधी पक्षांनी एकत्र येऊन हा मुद्दा राष्ट्रीय केला आहे, पण सत्ताधारी बाजूने अद्याप मौन आहे. भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधींच्या आरोपांना 'मेंदूची चिप चोरीला गेली' म्हणून हिणवले, पण पुराव्यांचा खुलासा केला नाही. लोकशाही ही जनतेची आहे, निवडणूक आयोगाची किंवा पक्षांची नाही. बोगस मतदारांचा हा काळा धबधबा थांबवण्यासाठी ईसीआयने वस्तुनिष्ठ तपास करावा. विशेष तीव्र सुधारणा मोहीम राबवावी, ज्यात प्रत्येक नावाची खात्री करावी. अन्यथा, १ नोव्हेंबरचा मोर्चा फक्त सुरुवात असेल. जनता जागी झाली की, खोटी निवडणुका टिकत नाहीत. महाराष्ट्राने आणि देशाने हा मुद्दा गांभीर्याने घ्यावा, अन्यथा लोकशाही किती खरी राहील?

# शरद पवार यांना हायकोर्टाचा दिलासा

## जिल्हाधिकारी व उपायुक्तांच्या आदेशाला स्थगिती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर ।** नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील या राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या गावातील व महाविकास आघाडीचे युवानेते, खासदार निलेश लंके यांचे निकटवर्तीय सरपंच शरद खंडेराव पवार यांना अखेर हायकोर्टाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. जिल्हाधिकारी पंकज आशिया व नाशिक विभागीय उपायुक्त अजय मोरे यांनी दिलेल्या अपात्रतेच्या आदेशावर छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने स्थगिती देत पवार यांना पुन्हा सरपंच पदाचा पदभार स्वीकारण्याचा मार्ग मोकळा केला आहे. हायकोर्टाचा निकाल समजताच चिचोंडी पाटील गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. सरपंच पवार गावात दाखल होताच ग्रामस्थ, महिला मंडळ, कार्यकर्त्यांनी ढोल-ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढत ग्रामपंचायतीपर्यंत त्यांच्या स्वागताचा जल्लोष केला. अपात्रतेपासून न्यायालयीन लढ्यापर्यंत माहिती अधिकार कार्यकर्ते व समाजसेवक सुधीर राजाराम भद्रे यांनी सरपंच पवार यांच्यावर चिचोंडी पाटील बसस्थानकाजवळ अतिक्रमणाचा आरोप करत जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी पवार यांना सरपंच पदावरून अपात्र ठरविले होते. पवार यांनी हा आदेश नाशिक विभागीय उपायुक्तांकडे अपील केला, परंतु तिथेही निकाल न लागल्याने त्यांनी हायकोर्टात पिटीशन दाखल केले. खंडपीठातील न्यायमूर्ती अरुण पेडणेकर यांच्या समोर झालेल्या सुनावणीत सरकार पक्ष आणि अर्जदारांकडून कोणतेही ठोस पुरावे न सादर केल्यामुळे हायकोर्टाने जिल्हाधिकारी व उपायुक्तांच्या आदेशाला स्टे देत सरपंच पवार यांच्या बाजूने निर्णय दिला. सदर प्रकरणात सरपंच पवार यांच्यावतीने वरिष्ठ वकील अँड. आर. एन. धोरडे व अँड. विठ्ठल दिघे यांनी युक्तिवाद केला, तर विरोधी बाजूने



अँड. अश्विन होण यांनी काम पाहिले. सत्य परेशान हो सकता है, पराजित नाही ` सरपंच शरद पवार निकालानंतर बोलताना सरपंच पवार म्हणाले, या सर्व कारवाया राजकीय दबावाखाली करण्यात आल्या होत्या. आम्ही महाविकास आघाडीचे कार्यकर्ते म्हणून सर्वसामान्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडले, त्यामुळे विरोधकांनी खोटे आरोप करून कारवाई घडवून आणली. पण सत्याचा विजय झाला, हेच लोकशाहीचे खरे सौंदर्य आहे. या प्रकरणात नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके, शिवसेना जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे, काँग्रेसचे उपाध्यक्ष संपतभाऊ मस्के, जि.प. उपाध्यक्ष प्रताप पाटील शेळके, तसेच महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ पवार यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले. सरपंच पवार यांनी आपल्या कायदेशीर लढ्याला साथ देणाऱ्या सर्व वकिलांचे ` अँड. धोरडे, अँड. दिघे, अँड. सत्यजित पवार, अँड. रविकिरण पाटील ` तसेच ग्रामस्थांचे आभार मानत म्हटले, सत्तेचा गैरवापर करून अन्याय होतो, पण न्यायालयात सत्याची ताकद नेहमी जिंकते.

# १५ कोटींच्या ७५ शेत पाणंद रस्त्यांना मंजुरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यात सुमारे १५ कोटी रुपयांच्या ७५ शेत पाणंद रस्त्यांना मंजुरी असल्याची माहिती आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी दिली नेवासा तालुक्यातील प्रत्येक शेती गटाला मजबूत रस्त्यांच्या माध्यमातून जोडून संपूर्ण तालुक्यात रस्त्यांचे जाळे निर्माण करणे हा आमचा संकल्प असल्याचे आ. विठ्ठलराव लंघे यांनी सांगितले.



महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत मातोश्री ग्रामसमृद्धी शेत, पाणंद रस्ते योजनेत पहिल्या टप्प्यात ४५ आणि दुसऱ्या टप्प्यात ३० असे एकूण ७५ शेतरस्त्यांना मंजुरी मिळाळी असून या मंजुरीसाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे सातत्याने पत्रव्यवहार आणि पाठपुरावा केला असल्याचे सांगितले

पहिल्या टप्प्यात ४५ रस्त्यांना आणि अवघ्या महिन्याभरात दुसऱ्या टप्प्यात आणखी ३० रस्त्यांच्या मजबुतीकरणास मान्यता मिळाली आहे.या दोन्ही टप्प्यांत मिळून सुमारे १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, मनरेगा योजनेअंतर्गत एकूण ७५ किलोमीटर लांबीचे शेतपाणंद रस्ते तयार होणार आहेत.

चांदा,म्हाळसपिंपळगाव,अंमळनेर,गोणेगाव, गोपाळपूर माळीचिंचोरा कौठा,सोनई, शिंगवे तुकाई, शिरसगाव, निंभारी,शिरेगाव, धामोरी बहिरवाडी सुलतानपूर, पिचडगाव, गणेशवाडी, नेवासा खुर्द, घोगरगाव, फत्तेपूर,सुकळी, बऱ्हाणपूर,पानेगाव,गिडेगाव, गोधेगाव, धनगरवाडी (खामगाव ), बेलेकर वाडी, भालगाव,गोपाळपुर, तमासवाडी, निपाणी निमगाव, हंडी निमगाव, बाभुळवेढा, लोहगाव, तेलकुडगाव, उस्थळ दुमाला, जळके खुर्द, पिंपरी शहाली, चिलेखनवाडी, बेलपांढरी,, कुकाना, पानसवाडी, वडाळा, नेवासा बुद्रुक, पुनतगाव, रस्तापूर, , लाखेफळ, राजेगाव, टोका, अशा ४९ गावांचा यामध्ये समावेश आहे.

पुढील काळातही आपल्याला तिसरा टप्पा ही लवकरच मिळणार आहे. त्यामुळे उर्वरित गावांचा यामध्ये सामावेश असणार आहे,या रस्त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी सुलभ मार्ग उपलब्ध करून देणे शेतातील मालाची सुरक्षित आणि जलद वाहतूक करणे सुलभ होणार आहेरस्त्यांशिवाय गावाचा विकास शक्य नाही; त्यामुळे रस्त्यांचे जाळे हेच विकासाचे खरे माध्यम ठरणार आहे, असे प्रतिपादन आमदार विठ्ठलराव लंघे यांनी केले.

# संजीवन सेवा ग्रुप जेष्ठ नागरिकांची मुख्यमंत्री पूरग्रस्त निधीसाठी मदत




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यात असलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा संजीवन ग्रुपच्या वतीने मुख्यमंत्री पूरग्रस्त निधीसाठी सत्तावीस हजाराची मदत धनादेशाच्या रूपाने तहसीलदार डॉ.संजय बिरादार यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली.

नेवासा तालुक्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या संजीवन ग्रुपमध्ये प्राध्यापक प्राचार्य शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी असे ८० सदस्य आहेत.सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या या ग्रुप मार्फत नेहमीच समाजाला अल्प मदत करण्यात येते. महाराष्ट्रामध्ये ओला दुष्काळ पडल्यामुळे अनेक भागात पूरग्रस्त व अतिवृष्टी ग्रस्त नागरिक आहेत या नागरिकांना मदतीचा हात संजीवन ग्रुपने पुढे केला आहे

नेवासा तालुक्याचे तहसीलदार डॉक्टर संजय बिरादार यांच्याकडे सत्तावीस हजाराचा धनादेश सुपूर्त करण्यात आला. पूरग्रस्तांना मदतीचा धनादेश प्रदान प्रसंगी संजीवन ग्रुपचे अध्यक्ष साहेबराव भणगे,सचिव रामकृष्ण नवले, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते भैयासाहेब देशमुख, दत्तात्रय आघाव,प्राचार्य कातोरे,प्राचार्य पंडितराव खाटीक,प्रा. यासीन शेख,ढोकणे व माजी कुलगुरू डॉ.अशोकराव ढगे उपस्थित होते. तहसीलदार डॉ. बिरादार म्हणाले की आपण एक चांगली सामाजिक कार्य केले आहे या पाठीमागची भावना अत्यंत मोलाची व पवित्र आहे आपण समाजाचे मानून मदत केली आहे त्याबद्दल पुनश्च आपले धन्यवाद याप्रसंगी प्राध्यापक दत्तात्रय आघाव यांनी सर्वांच्या वतीने मनोगत व्यक्त केले सर्व सदस्यांनी यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला आहे संजीवन ग्रुपचे सर्व सदस्य अभिनंदन पात्र आहेत याप्रसंगी नायब तहसीलदार चांगदेव बोरुडे उपस्थित होते

# कोकणे मित्रमंडळाकडून कामगाराची दिवाळी गोड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान मधील ग्रामपंचायत व ईतर सर्व संस्थाचे कर्मचारी यांना दिपिवली निमित्त साखर वाटपकरून त्यांची दिवाली गोड करण्यात आली.व त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे,प्रा. कार्लस साठे सर.जयकर मगर सर, श्रीधर गाडे,जेष्ठ विधीतज्ञ .प्रमोद वलटे,श्री. रेवणनाथ कोकणे,बापूसाहेब शिंदे,रंगनाथ (बंडू)कोकणे, बंडोपंत बोडखे, भाऊसाहेब कोकणे, काकासाहेब डिके,मधुकर गायकवाड,विष्णुपंत पटारे,सुभाष पटारे,सुरेश पवार,राजेंद्र देवळालकर, विधीतज्ञ रत्नाकर रणनवरे,अनिल बोडखे,गजानन कोकणे,अनिल कोकणे,राजेंद्र रणनवरे,सुलताने बाबा आदी सह गावातील विविध संस्थांचे कर्मचारी व ग्रामस्थ ऊपस्थित होते.



# टाकळीभान हायस्कूलला सर्वतोपरी सहकार्य करू : चंद्रकांत दळवी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** रयत शिक्षण संस्थेच्या टाकळीभान येथील न्यू इंग्लिश स्कूल व आण्णासाहेब पटारे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाला सर्वतोपरी सहकार्य करू असे आश्वासन रयत शिक्षण संस्थेचे विद्यमान चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी दिले . अहिल्यानगर येथे रयत शिक्षण संस्थेच्या अंबिका विद्यालयाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी साहेब , व्हाईस चेअरमन ॲड . भगीरथ शिंदे ,संस्थेचे सचिव विकास देशमुख ,सहसचिव बी .एन . पवार , उत्तर विभागीय अध्यक्ष आमदार आशुतोष दादा काळे,उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे आले असताना त्यांची रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य बापूसाहेब पटारे , विद्यालयाचे मुख्याध्यापक आर .एम .शिंदे, विद्यालयाचे उपशिक्षक आदिनाथ पाचपिंड ,संदीप जावळे यांनी सदिच्छा भेट घेतली .यावेळी टाकळीभान हायस्कूलसमोर असलेल्या विविध प्रकारच्या अडचणी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्यासमोर मांडल्या . टाकळीभान हायस्कूल गुणवत्तेच्या बाबतीत अग्रेसर असून परिसरातील विद्यार्थ्यांचा टाकळीभान हायस्कूल कडे ओघ वाढत आहे . वाढत्या विद्यार्थीसंख्येचा विचार करता भाडेतत्त्वावर असलेली जागा कायमस्वरूपी नावावर व्हावी , बांधकामाचे स्ट्रक्चरल ऑडिट लवकरात लवकर व्हावे या मागण्या संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या समोर केल्या . या सर्व प्रश्नांवर सकारात्मक प्रतिसाद देत टाकळीभान शाखेला रयत शिक्षण संस्थेच्या वतीने पूर्णपणे सहकार्य करण्याचे आश्वासन चंद्रकांत दळवी यांनी दिले.

# फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण : आनंदी क्षणातून निसर्गविनाश

भारतीय समाज हा सण-उत्सवप्रिय समाज म्हणून जगात ओळखला जातो. आपल्या संस्कृतीतील प्रत्येक सण हा आनंद, ऐक्य, परंपरा आणि श्रद्धेचे प्रतीक असतो. पण आधुनिक काळात या सणांच्या साजरीकरणात अनेक नव्या प्रथा समाविष्ट झाल्या आहेत, ज्यामुळे निसर्गाच्या आरोग्यावर आणि मानवी जीवनावर गंभीर परिणाम होत आहेत. त्यातीलच एक म्हणजे फटाक्यांचा अतिरेकी वापर, ज्यामुळे निर्माण होणारे ध्वनी आणि वायू प्रदूषण आज आपल्या समाजासाठी चिंतेचा विषय बनला आहे. दिवाळी, नाताळ, नवीन वर्ष, लग्नसोहळे, क्रिकेटमधील विजय किंवा राजकीय कार्यक्रम अशाप्रकारचा कोणताही प्रसंग असो, फटाक्यांच्या आवाजाशिवाय तो अपूर्ण वाटतो. परंतु या काही क्षणांच्या आनंदामागे दडलेले प्रदूषणाचे सत्य आपण वारंवार विसरतो.

फटाक्यांचे उत्पादन हे रासायनिक पदार्थांच्या जटिल मिश्रणावर आधारित असते. पोटॅशियम नायट्रेट, सल्फर, कोळशाची भुकटी, बॅरियम, मॅग्नेशियम, लीड, आर्सेनिक, ॲल्युमिनियम, स्ट्रॉन्शियम यांसारख्या अनेक धातू आणि रासायनिक घटकांचा वापर त्यात केला जातो. हे पदार्थ जळताना हवेमध्ये नायट्रोजन ऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड, कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनोऑक्साइड आणि सूक्ष्म धूलिकण सोडतात. या प्रदूषक वायूंमुळे वातावरणातील हवा विषारी बनते. विशेषतः झच२.५ आणि झच१० या सूक्ष्मकणांचे प्रमाण फटाक्यांच्या दहनावेळी अनेक पट वाढते. (झच२.५ म्हणजे अतिशय बारीक, आणि झच१० म्हणजे थोडे मोठे कण) हे सूक्ष्मकण इतके लहान असतात की ते थेट फुफ्फुसांमध्ये जाऊन रक्तप्रवाहात मिसळतात, ज्यामुळे श्वसनाचे आजार, दमा, ब्रॉन्कायटिस, फुफ्फुसाचे संक्रमण आणि हृदयविकारांची जोखीम वाढते.प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार, भारतातील प्रमुख शहरांमध्ये दिवाळीनंतर हवेमधील प्रदूषणाची पातळी नेहमीपेक्षा चार ते पाच पट वाढते. दिल्ली, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये दिवाळीच्या रात्रीनंतर झच२.५ च्या प्रमाणात अत्यंत झपाट्याने वाढ होते. दिल्लीमध्ये तर अटख (अळअॅ टींरश्रळीूं खपवशु) गंभीर या श्रेणीत म्हणजे ४००-५०० पर्यंत पोहोचतो. ही परिस्थिती श्वसनास त्रास देणारी आणि जीवघेणी ठरू शकते. हवेमध्ये सल्फर डायऑक्साइड व नायट्रोजन ऑक्साइडचे प्रमाण वाढल्यामुळे डोळ्यांत जळजळ, घसा खवखवणे, डोकेदुखी, थकवा आणि श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे सामान्यपणे दिसून येतात. फटाक्यांच्या दहनामुळे केवळ वायू प्रदूषणच नाही, तर ध्वनी प्रदूषणही प्रचंड प्रमाणात वाढते. साधारण मानवी कानाला सुरक्षित ध्वनीमर्यादा ७५ डेसिबेल इतकी असते, परंतु फटाक्यांच्या स्फोटावेळी आवाजाची तीव्रता १२० ते १५० डेसिबेलपर्यंत पोहोचते. अशा तीव्र आवाजामुळे कानातील श्रवणशक्तीवर परिणाम होतो, झोपेच्या गुणवत्तेत घट येते, रक्तदाब वाढतो आणि मानसिक ताण निर्माण होतो. वृद्ध व्यक्ती, लहान मुले आणि रुग्ण यांच्यासाठी हा आवाज विशेषतः त्रासदायक असतो. पक्षी, प्राणी यांनाही ध्वनी प्रदूषणाचा मोठा फटका बसतो. अनेक पक्षी दिशाभूल होऊन झाडांवरून पडतात, पाळीव प्राण्यांमध्ये भीती आणि अस्वस्थता निर्माण होते, तर वन्यजीवांमध्ये प्रजननाच्या प्रक्रियेवर परिणाम होतो. फटाक्यांचा परिणाम फक्त हवेमध्येच मर्यादित राहत नाही. त्यांचे अवशेष म्हणजे कागदाचे तुकडे, धातूंचे कण, प्लास्टिकचे कवच आणि राख जमिनीवर साचतात. हे सर्व नाल्यांत, पाण्याच्या स्रोतांत आणि शेतीच्या जमिनीत मिसळून जमिनीचे आणि जलस्रोतांचे प्रदूषण निर्माण करतात. जड धातूंचे हे अवशेष जमिनीतील पोषक घटकांची हानी करतात, त्यामुळे पीक उत्पादनावरही परिणाम होतो. नद्या आणि तलावांमध्ये मिसळलेले हे रसायन जलीय जीवसृष्टीसाठी घातक ठरते. यावर उपाय म्हणून जनजागृती आणि जबाबदार वर्तन अत्यंत आवश्यक आहे. सण साजरे करणे हे आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे, पण सण साजरा करताना निसर्गाचा अपमान न करता, पर्यावरणपूरक पद्धती अवलंबणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. आपण सणाचा आनंद फटाक्यांशिवायही साजरा करू शकतो. पारंपरिक दिवे, एलईडी लाइट्स, संगीत, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम आणि पर्यावरण रक्षणाचे संकल्प यांडरे. शाळा-कॉलेजांतून विद्यार्थ्यांना फटाक्यांच्या दुष्परिणामांबद्दल शिक्षित केले पाहिजे. माध्यमांनीही याबाबत जबाबदार भूमिका घेत जनतेला जागरूक करणे आवश्यक आहे. आजचा काळ हा हवामान बदलाचा आणि पर्यावरणीय संकटांचा काळ आहे. पृथ्वीचे तापमान वाढत आहे, पर्जन्यमानात अनिश्चितता वाढली आहे, आणि शुद्ध हवा हे आता लक्झरीसारखे झाले आहे. अशा वेळी काही क्षणांचा आनंद मिळवण्यासाठी आपण आपल्या भविष्याच्या श्वासावर संकट आणू शकत नाही. प्रत्येक नागरिकाने प्रदूषणमुक्त सण साजरा करण्याचा संकल्प केल्यास ही समस्या निश्चितच कमी होईल. फटाक्यांचा आवाज काही क्षणासाठी आकाश उजळवतो, पण त्याच धुराने आपल्या जीवनाचा प्रकाश मंदावतो. निसर्गाचा आवाज ऐका तो आपल्याला सांगतो की आनंद करा, पण जबाबदारीने. सण साजरा करा, पण प्रदूषण नको. प्रकाश पसरवा, पण निसर्गाच्या श्वासाच्या किंमतीवर नाही.

खरी दिवाळी, खरा आनंद, खरा प्रकाश तोच जो निसर्ग, समाज आणि मानव यांच्या समन्वयातून जन्मतो. चला, या सणासुदीला आपण सर्वांनी मिळून ठरवूया की फटाके नाही, फुलझड्यांऐवजी फुलांची सजावट, धूर नाही तर स्वच्छ हवा, आवाज नाही तर आनंदाचा गजर. कारण सणाचा खरा अर्थ आहे प्रकाशाचा उत्सव आणि तो प्रकाश पर्यावरणपूरक, स्वच्छ आणि शाश्वत असेल, तेव्हाच तो खऱ्या अर्थाने उज्ज्वल ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**समाजशास्त्राचे अभ्यासक**
**मो. ९९६०१०३५८२**

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# आ.काळेंचा पंचक्रोशीतील गाव विकासाचा मास्टर प्लॅन

## गोदावरी नदीवर कोपरगाव तालुक्यात साकारणार आणखी एक सेतू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : एम.डी.आर असो किंवा नसो ग्रामीण मार्ग असो किंवा नसो ज्या ठिकाणी नागरिकांची पुलाची मागणी आहे ज्या ठिकाणी पूल करणे अत्यंत गरजेचे आहे त्या ठिकाणी पूल उभारण्यास मंजुरी देण्याचा महत्वाचा निर्णय महायुती शासनाने घेतला आहे. मा.आ.अशोकदादा काळे यांनी गोदावरी नदीवर अनेक ठिकाणी पूल उभारले त्यामुळे दळणवळण वाढले त्याचा फायदा अनेक गावांना झाला. धारणगाव-कुंभारी पुलामुळे संपूर्ण पश्चिम भाग कोपरगाव शहराला जोडला जावून कोपरगाव शहराची बाजारपेठ फुलण्यास मोठी मदत झाली आहे. मी देखील वारी तसेच इतर ठिकाणी पूल उभारले आहे. सगळे पूल झाले आहेत सुरेगावचा पूल मात्र राहिला आहे. त्यामुळे हा पुल उभारण्यासाठी माझे प्रथम प्राधान्य असून त्यासाठी कमीत कमी २५ ते ३० कोटी निधी आवश्यक आहे. त्याबाबत माझा पाठपुरावा पण सुरु आहे. निधी उपलब्ध होताच पहिल्या टप्यात सुरेगाव-सांगवी भुसार पुलाचा प्रश्न मार्गी लावू अशी ग्वाही आ.आशुतोष काळे यांनी दिली.

कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव येथे ०१ कोटी ५० लाख रुपये निधीतून विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण आ.आशुतोष काळे यांच्या



सुरेगाव येथे ०१ कोटी ५० लाख रुपये निधीतून विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण प्रसंगी नागरीकांशी संवाद साधतांना आ.आशुतोष काळे.

हस्ते करण्यात आले याप्रसंगी ते बोलत होते. या विकास कामांमध्ये तलाठी कार्यालय व निकमनगर रस्ता खडीकरण कामाचे लोकार्पण तसेच दशक्रिया विधी शेड बनवणे,मोतीनगर स्मशानभूमी रस्ता करणे व स्मशानभूमी सुशोभीकरण करणे (टप्पा १ व २) आणि घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प यांचे भूमिपूजन आदी कामांचा समावेश आहे.

यावेळी पुढे बोलतांना आ.आशुतोष काळे म्हणाले की, स्व.कर्मवीर शंकररावजी काळे,मा.आ.अशोकराव काळे यांनी नेहमीच सुरेगावच्या विकास कामांना सर्वोतोपरी मदत केली आहे तोच वारसा मी पुढे चालवीत आहे. सुरेगावचे नागरीक नेहमीच सहकार्य करतात.२०१९ पूर्वी कोपरगाव शहराला २१ दिवसाआड पाणी येत होते परंतु पाच नंबर साठवण तलाव पूर्ण झाल्यामुळे चार दिवसाआड पाणी येते त्यामुळे २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत कोपरगावकरांनी मला भरभरून मतदान देतांना राज्यात क्रमांक पाचचे उंचांकी मतदान मिळाले यामध्ये सुरेगावचा पण मोठा वाटा आहे. सुरेगावकरांच्या ऋणातून उतराई होण्यासाठी विकास कामांना जास्तीत जास्त निधी कसा देता येईल हा माझा नेहमी प्रयत्न असतो. सुरेगावला एक स्मशानभूमी आहे परंतु गावाचा मोठा विस्तार असल्यामुळे दुसऱ्या स्मशानभूमीची नागरिकांची मागणी होती ती मागणी पूर्ण केली. जलजीवन योजनेच्या कामातून तलावाचे काम होणे गरजेचे आहे त्यासाठी अधिकचा निधी आवश्यक असून त्या योजनेला सुधारित प्रशासकीय मान्यता मिळविण्यासाठी माझा पाठपुरावा सुरु आहे. नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढत चालले आहे त्याला सुरेगाव देखील अपवाद नाही त्यामुळे सातत्याने गटारीच्या पाण्याची अडचण निर्माण होते त्यामुळे या गटारीच्या पाण्याचे योग्य नियोजन करणे हि काळाची गरज आहे. कोपरगाव शहराला भूमिगत गटारीसाठी निधी आणला आहे त्याप्रमाणे सुरेगाव, कोळपेवाडी, कोळगाव थडी, शहाजापूर या गावांच्या भूमिगत गटारीचा प्रश्न एकत्रितपणे मार्गी लावून हे सर्व पाणी एका ठिकाणी आणून शेतीसाठी वापरता येईल का? हि नागरिकांची मागणी नसली तरी हा प्रकल्प यशस्वी करता येईल का? याची चाचपणी करू. सुरेगावच्या विकासासाठी जिल्हा परिषद, राज्य शासनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी दिला व यापुढे पण देवू. राज्य मार्ग ०७ देर्डे फाटा ते भरवस फाटा तालुका हद्द या रस्त्याचे काम सुरु असल्यामुळे काही अडचणी येतील परंतु ज्यावेळी हा रस्ता पूर्ण होईल त्यावेळी भविष्यात हा रस्ता कित्येक दिवस करावा लागणार नाही एवढे भक्कम काम सुरु आहे.कोळपेवाडी-कोपरगाव या महत्वाच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असल्यामुळे हा रस्ता देखील सिमेंट कॉंक्रीटचा करावा लागणार आहे त्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे सांगत आ.आशुतोष काळे यांनी सुरेगावसह पंचक्रोशीतील गावांच्या विकासाचा मास्टर प्लॅन यावेळी उपस्थित नागरीकांपुढे मांडला त्यावेळी नागरीकांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

यावेळी परमपूज्य श्री गोवर्धनगिरीजी महाराज, शिवाजीराव वाबळे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सूर्यभान कोळपे, सुरेगावच्या सरपंच सौ.सुमनताई कोळपे, उपसरपंच सीमाताई कदम, तंटामुक्ती अध्यक्ष वाल्मिकआप्पा कोळपे, माजी संचालक राजेंद्र मेहेरखांब, गौतम बँकेचे संचालक राजेंद्र ढोमसे, पद्मविभुषण शरदचंद्र पवार पतसंस्थेचे संचालक ज्ञानेश्वर हाळनोर, सुदामराव वाबळे, गौतम कुक्कुट पालनचे संचालक सुशिल बोरावके, माजी सरपंच शशिकांत वाबळे, यशवंत निकम,अंबादास धनगर,डॉ.आय. के.सय्यद, प्रशांत वाबळे, माजी उपसरपंच मच्छिन्द्र हाळनोर, नामदेव कोळपे, सुहास वाबळे, भागवत कदम, सिद्धार्थ मेहेरखांब, पांडुरंग ढोमसे, श्रीधर कदम, हेमंत वाबळे, गणपत गोरे, मोतीराम निकम, अरुण लोंढे, रवींद्र देवकर, संजय ढोणे, माणिक उगले आदींसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

---

द•ख•ल

## भूषण भोकनळ युवासेनेच्या उपतालुकाप्रमुखपदी



**संगमनेर** : तालुक्यातील मंगळापुर येथील माझी उपसरपंच उत्तमराव भोकनळ यांचे पुत्र भूषण भोकनळ यांची युवासेना तालुका उपप्रमुखपदी निवड झाली आहे. पद्मश्री स्व. बाळासाहेब विखे पाटील व माजी मंत्री स्व. बि.जे. खताळ पाटील यांचे खांदे समर्थक म्हणून स्व उत्तमराव भोकनळ यांनी काम केलेले आहे. या भोकनळ परिवाराला दोन पिढ्यांची राजकीय ,सामाजिक आणि धार्मिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. त्यांच्यावर आ. खताळ यांनी युवासेना उप तालुकाप्रमुख पदाची अति महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. माझ्यावर आमदार अमोल खताळ यांनी जी.युवा सेना उपतालुका प्रमुख पदाची जबाबदारी टाकली आहे.त्याच कुठल्याही प्रकारचा तडा जाऊ न देता युवासेनेच्या माध्यमातून सर्व समाज घटकांना बरोबर घेऊन काम करेल असा विश्वास नूतन युवासेना उपतालुकाप्रमुख भूषण भोकनळ यांनी सांगितले.

## 'प्रदूषणमुक्त दिवाळी'साठी महिला पुलक मंचाचा उपक्रम




**श्रीरामपूर** : येथील दिगंबर जैन समाजाच्या महिला पुलक मंचातर्फे यंदाची दिवाळी प्रदूषणमुक्त साजरी करण्याचा संकल्प करण्यात आला असून, या उपक्रमांतर्गत शहरातील प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षांवर स्लोगन लावून जनजागृती करण्यात येत आहे.या उपक्रमाचा उद्देश म्हणजे फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण टाळणे आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनतेमध्ये जागरूकता निर्माण करणे. पुलक मंचाच्या अध्यक्ष प्रिया अग्रवाल यांनी माहिती देताना सांगितले की, फटाक्यांमुळे निर्माण होणाऱ्या धुरामुळे लहान मुलांच्या तसेच वृद्धांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतो. म्हणूनच यावर्षी 'संकल्प पर्यावरणाचा, निश्चय वसुंधराच्या रक्षणाचा' या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम हाती घेतला आहे.शहरातील रिक्षांवर प्रदूषणमुक्त दिवाळी चे संदेश असलेले स्लोगन्स लावून नागरिकांना पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या उपक्रमाला शहरवासीयांचा चांगला प्रतिसाद लाभत असून अनेकांनी या संकल्पाचे स्वागत केले आहे.उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती सुनिता कासलीवाल, श्रीमती रेखा पाटणी, सौ. जयमला चुडीवाल, सौ. वैशाली बडजाते, सौ. साधना चुडीवाल आणि सौ. सुनयना पापडीवाल यांनी विशेष परिश्रम घेतले.महिला पुलक मंच नेहमीच सामाजिक भान जपत उपक्रम राबवतो आणि समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न करतो, असे मत नागरिकांनी व्यक्त केले.

---

## जुन्या नोंदी तात्काळ उपलब्ध करा, मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव** :श्रीरामपूर तालुक्यातील महांकाळवाडगाव, भामाठाण, सरला आणि गोवर्धन या चार गावांचे १९६९ पूर्वीचे महसूल रेकॉर्ड, जन्म-मृत्यू नोंदी व शेतीचे फेरफार संबंधित प्रशासनाकडे उपलब्ध होत नसल्यामुळे येथील नागरिकांचे शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक नुकसान होत असल्याची तक्रार अविष्कार सेवाभावी बहुउद्देशीय प्रतिष्ठान व पोलीस मित्र पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटना यांच्या वतीने करण्यात आली आहे.



या संदर्भात संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष नर्मदा अहिरे यांनी अहिल्यानगर येथील जिल्हाधिकाऱ्यांना लेखी निवेदन दिले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सदर चारही गावे १९८१ पूर्वी वैजापूर तालुक्यात होती. मात्र त्यानंतर ही गावे श्रीरामपूर तालुक्यात समाविष्ट करण्यात आली. तथापि, या गावांमधील १९६९ पूर्वीच्या कोणत्याही नोंदी – महसूल दस्त, जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे, शैक्षणिक दस्तऐवज – ना श्रीरामपूरमध्ये उपलब्ध आहेत ना वैजापूरमध्ये.या नोंदींचा अभाव असल्याने येथे राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दाखले मिळण्यात अडचणी येतात, शासनाच्या योजनांचा लाभ मिळवताना त्रास होतो, त्या रेकॉर्डची तात्काळ उपलब्धता करून न्याय द्यावा, अशी स्पष्ट मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिल्या कार्यकर्त्यांना शुभेच्छा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : दीपावली म्हणजे मांगल्याचा आणि आनंदाचा सण. प्रत्येकाच्या जीवनात समृद्धी आणि प्रकाश निर्माण करणाऱ्या या पर्वानिमित्त काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी महसूल मंत्री आणि काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी आपल्या निवासस्थानी कार्यकर्त्यांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाला माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात तसेच संगमनेर शहर व तालुक्यातील मोठ्या संख्येने कार्यकर्ते, महिला व युवक उपस्थित होते.

यावेळी बोलताना थोरात म्हणाले, भारतीय संस्कृतीत दीपावलीचा सण हा अंधार दूर करणारा आणि आनंद द्विगुणित करणारा आहे. लहानथोर, सर्वजण एकत्र येऊन दिवाळी साजरी करतात. या काळात भेदभाव, दुःख विसरून आनंदाने पुढे जाण्याची संधी मिळते. सण साजरे करण्यामागेही एक सामाजिक उद्देश असतो – तो म्हणजे एकोप्याचा आणि समृद्धीचा संदेश.सर्व नागरिकांनी पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करावी आणि आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.आमदार सत्यजित तांबे यांनी सांगितले की, बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखालील अमृत उद्योग समूह आणि त्याच्याशी संलग्न सहकारी संस्थांनी दिवाळीनिमित्त शेतकरी, सभासद, कामगार, वाहतूकदार आदींना आर्थिक मदत केली असून सुमारे १५० कोटी रुपयांची उलाढाल सहकारातून बाजारात आली आहे. यामुळे संपूर्ण संगमनेर तालुक्यातील अर्थचक्र गतिमान झाले आहे.

---

# सौ. विखे व सौ. खताळ यांचं खेमनर कुटुंबीयांना भावनिक सांत्वन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : साकूर पठारभागातील लोकप्रिय भाजप नेते, जांभुळवाडीचे बुवाजी पा. खेमनर (वय ४९) यांचं हृदयविकाराच्या झटक्याने झालेलं अकाली निधन साकूरसह संपूर्ण संगमनेर तालुक्यासाठी मोठा धक्का ठरला आहे. समाजासाठी सतत धडपडणाऱ्या आणि निस्वार्थी काम करणाऱ्या या नेत्याच्या जाण्याने गावावर शोककळा पसरली आहे.



जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा आमदार अमोल खताळ यांच्या शालिनीताई विखे पाटील आणि पत्नी निलमताई खताळ यांनी स्व.

या दुःखद प्रसंगात अहिल्यानगर बुवाजी खेमनर यांच्या जांभुळवाडी येथील निवासस्थानी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांना धीर दिला.शालिनीताई विखे व निलमताई खताळ यांनी सर्वप्रथम बुवाजींच्या फोटोला पुष्पांजली अर्पण करत त्यांना श्रद्धांजली वाहिली. या भेटीत त्यांच्यात फक्त औपचारिकता नव्हती, तर एक सख्खेपण जाणवत होते. बुवाजी खेमनर यांचे समाजात असलेले योगदान, त्यांची कुटुंबवत्सल भूमिका आणि एक मार्गदर्शक नेता म्हणून त्यांनी दिलेलं योगदान शालिनीताईंनी आणि नीलमताईंनी आठवली. बुवाजींच्या आठवणी, त्यांच्या साधेपणाचं स्मरण करताना उपस्थितांचे डोळे पाणावले. कुटुंबीयांची आपुलकीने विचारपूस करताना, या दुःखद प्रसंगात आपण एकटे नाही, हा विश्वास दोघींनी त्यांच्या वागण्यातून दिला. समाजसेवेतून निसटलेला एक दीपबुवाजी खेमनर यांच्या निधनाने साकूर पठारभागातील राजकारणात आणि सामाजिक क्षेत्रात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

## अवैध घरकुल बांधकामाला ग्रामस्थांचा तीव्र विरोध, प्रशासनाचे दुर्लक्ष?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील प्रतापपूर येथील एका घरकुल लाभार्थ्याने मंजूर जागेपेक्षा जास्त जागेत आणि अनधिकृतपणे बांधकाम सुरू केल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. धोंडीराम गंगाराम आंधळे यांनी ग्रामपंचायत आणि पोलीस प्रशासनाकडे याबाबत तक्रार केली आहे, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिवाजी शिंदे यांना घरकुल योजनेअंतर्गत २५ बाय २५ फूट जागेवर बांधकाम करण्याची परवानगी मिळाली होती. परंतु, शिंदे यांनी या मंजूर क्षेत्रापेक्षा अधिक जागेत बांधकाम सुरू केले आहे. विशेष म्हणजे, त्यांनी खरेदी केलेल्या किंवा त्यांना मिळालेल्या जागेच्या वैधतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या जागेचा मूळ मालक कोण आणि ती त्यांना कशी प्राप्त झाली, याबाबत चौकशीची मागणी होत आहे.ग्रामपंचायतने या संदर्भात शिंदे यांना रीतसर तीन नोटिसा बजावल्या आहेत, मात्र त्यांनी त्याकडे दुर्लक्ष करत बांधकाम सुरूच ठेवले आहे. जेव्हा ग्रामपंचायतीचे अधिकारी काम थांबवण्यासाठी घटनास्थळी गेले, तेव्हा शिंदे यांच्या कुटुंबीयांनी, विशेषतः त्यांच्या पत्नीने अधिकाऱ्यांशी अरेरावी करत त्यांना काम करण्यापासून रोखले, असा आरोप तक्रारदार धोंडीराम आंधळे यांनी केला आहे.या प्रकारानंतर, धोंडीराम आंधळे यांनी आश्वी पोलीस स्टेशनमध्येही तक्रार अर्ज दाखल केला.

---

## कुस्ती स्पर्धेत त्रिमूर्तीच्या खेळाडूंना दोन सुवर्ण एक रौप्य व कास्य पदक



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणेअंतर्गत जिल्हा परिषद व क्रीडा कार्यालय अहिल्यानगर तसेच त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित दादासाहेब हरिभाऊ घाडगे पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय त्रिमूर्ती नगर नेवासा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघ यांच्या सहकार्याने आयोजित शालेय १९ वर्ष मुले व मुली राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या मल्लांनी घवघवीत यश मिळवले.

त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान नेवासा फाटा या ठिकाणी दिनांक १४ ते १६ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीत शालेय १९ वर्ष मुले व मुलींच्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा पार पडल्या या स्पर्धेत त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित श्री दादासाहेब हरिभाऊ घाडगे पाटील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय त्रिमूर्ती नगर मुकिंदपुर येथील मल्लांनी दोन सुवर्ण एक रौप्य व एक कास्यपदकाची कामगिरी केली.विजेते खेळाडू पुढील प्रमाणे प्रशांत संतोष रुपनवर ६१ किलो फ्रीस्टाईल मध्ये सुवर्णपदक,शुभम मनोहर जाधव ७२ किलो ग्रीक रोमन मध्ये सुवर्णपदक,जयदीप गोरख पुऱ्हे ६७ किलो ग्रीको रोमन मध्ये रौप्यपदक,सुशांत विजय धायगुडे ९७ किलो ग्रीको रोमन कास्यपदक पटकावले.सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.विजयी खेळाडूंना कुस्ती प्रशिक्षक संभाजी निकाळजे, संजय यादव यांचे प्रशिक्षण लाभत आहे. क्रीडा प्रशिक्षक ,अभिजीत दळवी,महादेव काकडे, छबुराव काळे,गणेश शिंदे,साहेबराव दाणे अशोक पानकडे, संदीप वाघमारे,मुकेश जाधव,नितीन चिरमाडे यांचे सहकार्य लाभत आहे. यशस्वी खेळाडूंचे संस्थेच्या अध्यक्षा अँड.सौ.सुमतीताई घाडगे पाटील, उपाध्यक्ष स्नेहलदीदी चव्हाण-घाडगे पाटील,सचिव मनिष घाडगे पाटील, सहसचिव श्रुती दीदी आमले घाडगे पाटील, विश्वस्त चेतन चव्हाण सर, डॉ. गौरव आमले सर,प्राचार्य सोपानराव काळे, समन्वयक दत्तात्रय वांढेकर, प्राचार्य अरविंद देशमुख,क्रीडा प्रमुख संजयसिंह चौहान, विभाग प्रमुख संतोष निंबाळकर, नामदेव ताके,एकनाथ कापसे, अशोक कानवडे, राजेंद्र कात्रज,संतोष राऊत यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## सौ.सुशिलामाई काळे महाविद्यालयाच्या ईश्वरी निंबाळकरची चमकदार कामगिरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : केंद्र सरकार आयोजित राष्ट्रीय एकात्मता शिबिरात कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित सौ.सुशिलामाई काळे महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष वाणिज्य शाखेच्या कु. ईश्वरी विठ्ठल निंबाळकर हिने धावण्याच्या राष्ट्रीय स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असल्याची माहिती प्राचार्या डॉ.सौ.विजया गुरसळ यांनी दिली.

हरियाणा राज्यातील हिसार येथील चौधरी चरणसिंग कृषी विद्यापीठ येथे (दि.८) ते (दि.१४) ऑक्टोबर दरम्यान राष्ट्रीय एकात्मता शिबिर पार पडले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने कु.ईश्वरी निंबाळकरसह केवळ तीन विद्यार्थिनींची या शिबिरासाठी निवड करण्यात आली होती. या कालावधीत श्री सत्य साई सेवा संस्था, हिसार यांच्या वतीने आयोजित मुलींच्या गटातील ३ कि.मी. धावण्याच्या स्पर्धेत ईश्वरीने उल्लेखनीय कामगिरी करत तिसरा क्रमांक मिळविला. या यशासाठी तिला प्रा. विशाल पोटे, डॉ.भाऊसाहेब कांबळे, प्रा.भिमराव रोकडे,प्रा. विनोद मैंद यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.कु.ईश्वरी निंबाळकर हिने मिळविलेल्या यशाबद्दल कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मा.आ.अशोकराव काळे, विश्वस्त आ.आशुतोष काळे, सचिव सौ.चैतालीताई काळे, संस्था निरीक्षक प्रा.नारायण बारे, प्राचार्या डॉ.सौ.विजया गुरसळ यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जाहीर निविदा

माधवराव बारकुजी पा. शिंदे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि, पोहेगांव या संस्थेकडून नविन इमारत बांधकाम व व्यापारी गाळे संस्थेच्या जागेवर बांधण्यात येणार आहे. यासाठी नोंदणीकृत व अनुभवी बांधकाम मक्तेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा, कामाच्या संबधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती पाहण्यासाठी कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. निविदा पत्रक विक्री व निविदा दाखल करण्याचा कालावधी दिनांक २०/१०/२०२५ ते २७/१०/२०२५ संस्थेचे कार्यालयात सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत निविदा उघडण्याची ता ३०/१०/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार संस्थेच्या संचालक मंडळाने राखीव ठेवला आहे.

**चेअरमन** **सचिव**

**माधवराव बारकुजी पा. शिंदे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि, पोहेगांव ता. कोपरगांव जि.अहिल्यानगर**

# संगमनेर नगरपरिषदेला १.५० कोटींचा निधी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागा तर्फे माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत संगमनेर नगरपरिषदेला १ कोटी, ५० लाख ५ हजार,४७७ इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून शहरात पर्यावरण संवर्धन, पर्जन्यजल संचयन, सौर ऊर्जा वापर आणि जनजागृतीसाठी महत्त्वाची कामे हाती घेण्यात येणार असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले

या निर्णयाबद्दल आ. अमोल खताळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार व्यक्त केले आहे.



*या निधीअंतर्गत वृक्षारोपण व गार्डन विकास (समूहित) ७४ लाख,४५, हजार ८०३(विविध उद्याने , खुल्या जागा , रस्ता कडेची लागवड आणि घनदाट वनराई प्रकल्प यांचा समावेश)पर्जन्यजल संचयनासाठी परकुलेशन पिट्स २२लाख ५१हजार,६४१ कवी अनंत फदी नाट्यगृह येथे ऑन-ग्रिड सौरऊर्जाप्रणाली ४२ लाख ०४,हजार ०३३ पर्यावरण विषयक माहिती शिक्षण जनजागृती मोहिम ७,लाख५०,हजार*

*महायुती सरकारकडून संगमनेरच्या पर्यावरणसंवर्धनासाठी मिळालेला १.५० कोटींचा निधी हा संगमनेरकरांसाठी मोठा दिलासा आहे. वृक्षारोपण, पर्जन्य जल संचयन आणि सौर ऊर्जा यांसारख्या उपक्रमांमुळे शहरात हरित व शाश्वत विकासाला चालना मिळेल. नगरपरिषदे च्या माध्यमातून सर्व कामे गतिमान पद्धतीने पूर्ण केली जातील,*

***-अमोल खताळ पाटील, आमदार संगमनेर विधानसभा***

# राज्यातील गोधन वाचविण्यात लसीकरणाचा मोठा वाटा : ना.विखे

## पंचकृष्णा डेअरीत दूध उत्पादकांचा सन्मान व प्रयोगशाळेचे उद्घाटन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहाता :** राज्यात लम्पी साथरोगाच्या संकटकाळात सरकारने मोफत लसीकरणाचा घेतलेला निर्णय फार महत्त्वाचा ठरला असून, यामुळे राज्यातील गोधनाचे मोठ्या प्रमणावर संरक्षण होऊ शकले, असे प्रतिपादन जलसंपदा व पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

राहाता तालुक्यातील पंचकृष्णा डेअरीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात दूध उत्पादक शेतकऱ्यांचा सन्मान, विमा प्रमाणपत्रांचे वितरण आणि प्रयोगशाळेचे उद्घाटन मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत पार पडले.

या प्रसंगी गणेश कारखान्याचे माजी चेअरमन मुकुंदराव सदाफळ, मोहनराव सदाफळ, जबाजी मेचे, ॲड. रघुनाथ बोठे, स्वाधीन गाडेकर, नितीन कापसे, साहेबराव निधाणे, मुख्याधिकारी वैभव लोंढे, सुनिल सदाफळ, सुदर्शन सदाफळ आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मंत्री विखे पाटील म्हणाले की, राज्यात सॉर्टेड सिमेन्सच्या अतीवापरामुळे भविष्यात कालवडींची संख्या वाढण्याची शक्यता असून, त्यामुळे वाढणाऱ्या दूध उत्पादनाचे नियोजन आताच करणे आवश्यक आहे. यासाठी त्यांनी संबंधित मंत्री ना. पंकजा मुंडे यांच्याशी चर्चा केली असल्याचे त्यांनी सांगितले.

दूध व्यवसायाला स्थैर्य देण्यासाठी सरकारने अनेक धोरणात्मक निर्णय घेतले असून, राज्यात सहकारी व खासगी दूध संघांमध्ये निर्माण झालेली स्पर्धा ही दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी आव्हान ठरत आहे. मात्र अशा परिस्थितीत पंचकृष्णा डेअरी सारख्या संस्थांनी गावपातळीवर विश्वास संपादन करून उत्तम कार्य केले असून, यासाठी त्यांनी सुनिल व सुदर्शन सदाफळ यांचे विशेष अभिनंदन केले.

राज्यातील अतिरिक्त दूध खरेदीसाठी अमूल उद्योग समूह शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहिला असून, या समूहाने खरेदी सुरू ठेवावी यासाठी आपल्यातर्फे सतत बैठका घेण्यात आल्या, असे त्यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेतून आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तब्बल ३५ वर्षांनंतर राज्यात गोसेवा आयोगाची स्थापना आणि गोमातेला 'राज्य माते'चा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला, याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.

लम्पी साथरोगाच्या काळात राज्यभर मोफत लसीकरणाची मोहिम राबविण्यात आली. यामुळे गोधनाचे मोठ्या प्रमाणावर रक्षण झाले. त्याचप्रमाणे पशुखाद्यांमध्ये असलेल्या घटकांची माहिती थेट गोण्यांवर छापून देण्याबाबतची नियमावली राज्यात प्रथमच लागू करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी पंचकृष्णा डेअरीच्या कार्यप्रणालीचे कौतुक करत संस्थेच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




## पान १ वरुन

### पाच डॉक्टरांवर गुन्हा

नेमलेल्या तज्ज्ञ समितीने सादर केलेल्या अहवालात डॉक्टरांनी गंभीर स्वरूपाचा निष्काळजीपणा, हलगर्जीपणा व गैरव्यवहार केल्याचे स्पष्ट करण्यात आले. अखेर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने याप्रकरणात संपूर्ण दखल घेत डॉक्टरांवर आणि संबंधित कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. या प्रकरणात न्युक्लिअस हॉस्पिटलचे डॉ. गोपाळ बहुरुपी, डॉ. सुधीर बोरकर (रा. पाईपलाईन रस्ता, सावेडी), डॉ. सचिन पांडुळे, डॉ. अक्षयदीप झावरे, डॉ. मुकुंद तांदळे (सर्व रा. नगर), तसेच डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलमधील लॅब तज्ज्ञ डॉक्टर यांच्यासह एका अज्ञात कर्मचाऱ्यांवर कटकारस्थान, फसवणूक, निष्काळजीपणा, चुकीचा उपचार देणे, मृत्यूस कारणीभूत ठरणे, मृतदेहाची विल्हेवाट लावणे आणि पुरावे नष्ट करणे या गंभीर आरोपांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, रुग्णाला खोट्या कोरोना रिपोर्टच्या आधारे हॉस्पिटलमध्ये अडवून ठेवले गेले, त्याला अन्न-पाणी न देता मारहाण केली गेली. एकाच दिवसात दोन हॉस्पिटल्समध्ये उपचार दाखवून भरमसाट बिले लावण्यात आली. सर्वात गंभीर म्हणजे, मृत्यू झाल्यानंतर मृतदेह लपवून, त्याची परस्पर विल्हेवाट लावण्यात आली. या मागे अवयव तस्करीचाही संशय फिर्यादीने व्यक्त केला आहे.या संपूर्ण प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दरम्यान, या खळबळजनक घटनेनंतर अहिल्यानगरसह राज्यभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. वैद्यकीय व्यावसायिकांनी आपली नैतिक जबाबदारी ओळखून काम करणे गरजेचे असून, अशा प्रकरणांवर कठोर कारवाई होणे अत्यावश्यक आहे, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

### १ नोव्हेंबरला निवडणूक आयोगाविरोधात मुंबईत विराट मोर्चा

दाखवली जाईल. या मोर्चाचं नेतृत्व ज्येष्ठ नेते शरद पवार, शिवसेना उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि मविआतील इतर नेते करतील. त्या दृष्टीने पुढील पावलं टाकली जातील.

### काष्टी हादरलं!

बाळाला घेऊ नकोस एवढे सांगितल्याचा राग आल्याने दोघा आरोपींनी वृद्ध शिवाजी वाघ यांना निर्दयपणे मारहाण केली. या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात विशाल राजु वाघ आणि राजु विठ्ठल वाघ या दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १०३(१), ३(५) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील विशाल वाघला पोलिसांनी मध्यरात्री अटक केली असून राजु विठ्ठल वाघ फरार असून पोलिस त्याचा कसून शोध घेत आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### कर्णधार सूर्यकुमार यादव साईदरबारी!

आरतीवेळी यादव परिवाराने उपस्थित राहून साईबाबांचे दर्शन घेतले आणि पूजा-अर्चना केली.

### भाजपचे प्रकाश चित्ते शिंदेच्या शिवसेनेत

आहे. यामुळे श्रीरामपूर नगरपालिका निवडणुकीत शिंदे गटाची ताकद वाढणार असून प्रकाश चित्ते हे शिवसेनेच्या पॅनलचे नेतृत्व करतील हे जवळपास निश्चित मानले जात आहे. प्रकाश चित्ते हे भाजपमधील प्रभावशाली हिंदुत्ववादी नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या प्रवेश सोहळ्यास शिवसेनेचे सचिव राम रेपाळे, तालुका संपर्कप्रमुख जनार्दन गालपगारे, सुनिल मुथा, संजय पांडे, राजेंद्र कांबळे आणि माजी नगरसेवक किरण लुनिया उपस्थित होते. यावेळी चित्ते यांच्यासह देवळाली प्रवरा येथील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी प्रवेश केला. या प्रवेशामुळे शिंदे गटाला नगरपालिका व जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत ताकद मिळेल.

# आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत बोरावके महाविद्यालयास सांघिक विजेतेपद



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अहिल्यानगर जिल्हा विभागीय क्रीडा समिती अंतर्गत भेंडे येथील जिजामाता महाविद्यालय आयोजित आंतर महाविद्यालयीन मुले व मुली मैदानी स्पर्धत रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालयाच्या मुले व मुलींच्या संघाने अभूतपूर्व कामगिरी करत सलग दुसऱ्या वर्षी सांघिक विजेतेपद मिळवले. हा क्षण केवळ विजयाचा नाही, तर सातत्यपूर्ण परिश्रम, एकजूट आणि प्रत्येक खेळाडूने मैदानावर दाखवलेली जिद्द आणि एकमेकांप्रती असलेला विश्वास हा या यशामागचा खरा पाया ठरला. प्रचंड दडपणातही शांतता राखत, प्रत्येक क्षणी संघभावनेला प्राधान्य देणं खेळाडूनी मैदानी स्पर्धेत सांघिक विजेतेपद मिळवले. तसेच शारदाबाई गोविंदराव पवार फिरता करंडक (जनरल चॅम्पियनशिप) वर आपले नाव कोरले. विजयी संघास जिजामाता कॉलेज, भेंडेचे प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे यांच्या हस्ते फिरता करंडक व विजयी ट्रॉफी प्रदान करण्यात आली. यावेळी पदक प्राप्त सर्व खेळाडूंचे श्रीमती मीनाताई जगधने (चेअरमन, रयत शैक्षणिक संकुल श्रीरामपूर आणि सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण बडधे उपप्राचार्य डॉ.अनुप दळवी, डॉ.एस.एन. शेळके, सर्व प्राध्यापक यांनी विजयी खेळाडूचे अभिनंदन करून पुढील आंतर विभागीय स्पर्धसाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धत मुलींमध्ये १०० मी. धावणे दिव्यांगी लांडे (सुवर्ण पदक), सायली काळे (सिल्व्हर मेडल). २०० मी. धावणे दिव्यांगी लांडे (सुवर्ण पदक), स्मिता चव्हाण (सिल्व्हर मेडल). ४०० मिटर - सायली काळे (सुवर्णपदक), स्मिता चव्हाण (सिल्व्हर मेडल). १० व ५ किमी धावणे स्पर्धत वर्षा बर्डे (सिल्व्हर मेडल), ४१०० रिले स्पर्धत दिव्यांगी लांडे, सायली काळे, स्मिता चव्हाण, तनुजा उदारे (सुवर्णपदक), ४४०० रिले स्पर्धत सायली काळे, स्मिता चव्हाण, ज्योती बर्डे, तनुजा उदारे (सुवर्णपदक),

मुलांमध्ये १०० मीटर धावणे किरण म्हस्के (सुवर्णपदक), ऋषीकेश देवकर (सिल्व्हर मेडल). २०० मीटर किरण म्हस्के (सिल्व्हर मेडल). लांबउडी किरण भोंडगे (सिल्व्हर मेडल). उंचउडी शुभम वाकडे (सिल्व्हर मेडल), रोहन पटारे (ब्रॉंझ मेडल). १० किमी धावणे ईश्वर कुंजाळे (सिल्व्हर मेडल). ४१०० रिले किरण म्हस्के, ऋषीकेश देवकर, किरण भोंडगे, विशाल गायकवाड (सुवर्णपदक),आणि ४४०० रिले किरण म्हस्के, ऋषीकेश देवकर, कार्तिक जाधव, विशाल गायकवाड (सुवर्णपदक) मिळवले.

# घरच्यांच्या विरोधामुळे प्रेमी युगुलाचा गळफास

**बीड :** प्रेमसंबंधांना विरोध केल्याने लातूरमध्ये एका प्रेमी युगुलाने गळफास घेत आत्महत्या केली. लातूर शहराजवळ असणाऱ्या पेठ गावच्या शिवारात ही घटना घडली आहे. या घटनेची माहिती मिळताच लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पथक आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, लातूर शहराच्या ४ किलोमीटरवर असलेल्या पेठ गावच्या शिवारात एका पत्र्याच्या शेडमध्ये प्रेमी युगुलाने गळफास घेत जीवन संपवले. दोघेही बीड जिल्ह्याच्या अंबाजोगाई तालुक्यातील दगडवाडी येथील रहिवाशी असल्याचे म्हटले जात आहे. नात्याला घरच्यांचा विरोध असल्याने दोघांनी हा टोकाचा निर्णय घेतल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. तरुणी ही लातूर येथील एका खासगी रुग्णालयात नोकरी करत होती. तर तिचा प्रियकर हा लातूरच्या अहमदपूर येथे एमपीएससीच्या स्पर्धा परीक्षेची तयारी करत होता. तो शारीरिकदृष्ट्या अपंग आहे. दोघेही अनेक वर्षांपासून प्रेमसंबंधात होते, तरुणी आणि तिचा प्रियकर दोघेही भावकीत होते. त्यांच्या प्रेमसंबंधाला घरच्यांचा प्रचंड विरोध होता. भावकीमध्ये असल्याने आणि तरुण शारीरिकदृष्ट्या अपंग असल्याने तरुणीच्या घरातून प्रेमाला, लग्नाचा विरोध सुरु होता. याशिवाय तरुणाच्या कुटुंबीयांनाही ही गोष्ट मान्य नव्हती. कायमच एकत्र राहण्यासाठी दोघांनी टोकाचे पाऊल उचलले. या आत्महत्या प्रकरणाचा तपास लातूर ग्रामीण पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग करत आहेत. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

# शासकीय कार्यालयांत ओळखपत्र सक्तीचे; नियम भंग केल्यास वेतन कपात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** राज्यातील सर्व शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आता ओळखपत्र (आयकार्ड) लावणे बंधनकारक करण्यात आले असून, याबाबतचा शासन निर्णय (जीआर) जारी करण्यात आला आहे. ओळखपत्र न लावणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात शिस्तभंगाची कारवाई केली जाणार असून, एक दिवसाच्या वेतन कपातीचाही इशारा देण्यात आला आहे.

शासकीय कार्यालयांत नागरिकांना अनेकदा अधिकारी व कर्मचाऱ्यांची ओळख पटत नाही. तसेच कर्मचारी भासवून खासगी व्यक्तींचीही लुडबूड सुरू असते. यामुळे अनेक गैरप्रकार, वादही होतात. विशेषतः जिल्हाधिकारी कार्यालयासह महापालिका आणि जिल्हा परिषदेच्या कार्यालयांमध्ये 'बाहेरच्यांची' लुडबूड टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. अनेकदा कर्मचारी आणि अभ्यागत यांच्यातील फरक ओळखणे कठीण जाते. त्यामुळे वादाच्या घटनाही घडतात.

अलीकडच्या काळात महसूल विभागासह विविध सरकारी विभागांमध्ये लाचखोरीच्या घटना वाढल्या आहेत. पंचनाम्याच्या वेळी संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांकडे ओळखपत्र नसल्याचे प्रकार समोर येत आहेत. त्यामुळे 'अर्थपूर्ण' व्यवहारांना आळा घालण्यासाठी शासनाने ओळखपत्र सक्तीचा निर्णय घेतला आहे.

काही कर्मचारी शासकीय बैठकीच्या वेळीच ओळखपत्र लावतात, तर इतरवेळी ते खिशात ठेवतात. तसेच, अनेक कर्मचारी नियम असूनही विनाअधिकारच कार्यालयात दिसतात. त्यामुळे या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्य शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे सरकारी कार्यालयांमधील सुरक्षा वाढवण्याबरोबरच कर्मचाऱ्यांची जबाबदारी आणि पारदर्शकता सुनिश्चित होणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व कर्मचाऱ्यांना ओळखपत्र लावणे बंधनकारक केले आहे. विना अधिकार कुणीही कार्यालयात येत नाही.

**-जनार्दन विधाते,**
**निवासी उपजिल्हाधिकारी**

## निधन वार्ता..

### भागूबाई कदम



**अहिल्यानगर :** नेवासा तालुक्यातील बेल्हेकवाडी येथील भागुबाई लक्ष्मण कदम (वय ८५) यांचे शुक्रवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या माधव कदम, सिताराम कदम व बापूसाहेब कदम यांच्या मातोश्री, पत्रकार भाऊ कदम यांच्या त्या चुलती होत.



## नशिबाची परिक्षा

**सोमवार दि.२० ऑक्टोबर २०२५**

**मिलनम डे**
उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

| उदय | | अस्त | जोड |
|---|---|---|---|
| १९० २८० ००० | २-९ | १३७ ३८० १०० | ०८-२१-४३-९५-१७ |

**कल्याण**
उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

| उदय | | अस्त | जोड |
|---|---|---|---|
| १२६ ४६९ ३६० | ९-५ | १४० २३० ७८० | ९७-१५-०२-३६-५८ |

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

| उदय | | अस्त | जोड |
|---|---|---|---|
| १२३ २४० ३३० | ६-७ | १२४ ४६७ ७०० | ६५-७४-३१-०२-९७ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 28/04/2025 to 03/05/2025 | 789 43 256 | 128 14 167 | 345 25 168 | 150 69 180 | 136 05 159 | 127 00 569 |
| 05/05/2025 to 10/05/2025 | 135 98 116 | 479 04 112 | 136 03 148 | 123 62 138 | 158 47 269 | 257 45 258 |
| 12/05/2025 to 17/05/2025 | 233 82 336 | 569 00 389 | 278 74 590 | 288 83 157 | 389 08 468 | 690 57 160 |
| 19/05/2025 to 24/05/2025 | 900 99 360 | 190 00 145 | 167 47 340 | 237 21 137 | 179 72 129 | 390 26 367 |
| 26/05/2025 to 31/05/2025 | 148 30 145 | 259 61 128 | 470 16 457 | 125 81 678 | 790 65 690 | 247 38 170 |
| 02/06/2025 to 07/06/2025 | 229 34 455 | 899 62 138 | 778 21 470 | 244 02 336 | 255 23 247 | 110 24 248 |
| 09/06/2025 to 14/06/2025 | 579 11 335 | 990 89 568 | 356 40 578 | 160 76 790 | 158 44 167 | 133 75 159 |
| 16/06/2025 to 21/06/2025 | 578 07 115 | 220 42 138 | 446 48 125 | 148 33 599 | 278 72 390 | 689 34 770 |
| 23/06/2025 to 28/06/2025 | 159 53 247 | 125 81 236 | 279 81 137 | 248 48 800 | 256 31 344 | 349 64 590 |
| 30/06/2025 to 05/07/2025 | 145 06 349 | 470 14 699 | 334 02 660 | 470 15 780 | 369 89 126 | 223 75 267 |
| 07/07/2025 to 12/07/2025 | 189 81 380 | 233 88 224 | 378 88 189 | 699 41 335 | 248 48 125 | 458 77 467 |
| 14/07/2025 to 19/07/2025 | 789 44 248 | 116 85 140 | 138 28 189 | 359 72 138 | 689 36 268 | 678 13 346 |
| 21/07/2025 to 26/07/2025 | 790 68 350 | 678 10 299 | 389 05 456 | 377 71 669 | 378 82 345 | 150 61 678 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *



# राज्यातील आठ कृषी महाविद्यालये बंद होणार?

## तीन हजार जागा रिक्त; विद्यार्थ्यांचा अल्प प्रतिसाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी स्थिर करिअर देणारे आणि शेतीत नवे तंत्रज्ञान आणणारे कृषी शिक्षण विद्यार्थ्यांच्या पसंतीतून मागे पडत असून, यंदा सुमारे तीन हजार जागा रिक्त राहिल्या आहेत. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळत नसल्याने, नव्याने सुरू झालेली आठ महाविद्यालये बंद पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, गेल्या वर्षीच्या तुलनेत प्रवेश किंचित वाढल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते.

'सीईटी सेल'कडून प्रथम वर्ष पदवी कृषी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया नुकतीच संपली. राज्यातील कृषी अभियांत्रिकी, फुड टेक्नॉलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, कम्युनिटी सायन्स, फॉरेस्ट्री, हॉर्टिकल्चर अशा अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी गेल्या वर्षी प्रवेशासाठी १८ हजार २०७ जागा उपलब्ध होत्या. त्यापैकी १३ हजार ६५६ जागांवर प्रवेश झाले होते. यंदा प्रवेशांमध्ये थोडी वाढ झाली आहे. यंदा प्रवेशासाठी १६ हजार ८२९ जागा उपलब्ध होत्या. यापैकी १३ हजार ८९२ जागा भरल्या गेल्या असून, दोन हजार ९३७ जागा रिक्त राहिल्या आहेत. त्यामुळे प्रवेशाचा टक्का ८२.५५ एवढा आहे. सरकारी संस्थांमध्ये ९५.३२ टक्के, तर खासगी संस्थांमध्ये ७९.२२ टक्के जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत.

अशी परिस्थिती असली, तरी राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी या विद्यापीठांशी संलग्न असलेल्या काही महाविद्यालयांमध्ये अत्यंत कमी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. यंदा ४४ महाविद्यालयांमध्ये निम्मे किंवा निम्म्यापेक्षा अधिक प्रवेश झाले आहेत. बी. टेक (कृषी अभियांत्रिकी) अभ्यासक्रमांच्या ८४० पैकी ४९८ जागा भरल्या असून, ३४२ जागा रिक्त आहेत. बी. टेक (बायोटेक्नॉलॉजी) अभ्यासक्रमात ९८७पैकी ६४६ जागा भरल्या असून, ३४१ जागा रिक्त राहिल्या आहेत, असे या आकडेवारीवरून स्पष्ट होते.

### कमी प्रतिसादची कारणे

- कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. मात्र, अभ्यासक्रमात त्या प्रमाणात बदल झालेले नाहीत. कृषी पदवीधरांना सरकारी नोकऱ्यांची संधी कमी. खासगी क्षेत्रातील रोजगार स्थिर नसल्याने विद्यार्थ्यांचा इतर शाखांकडे कल वाढला. कृषी अभियांत्रिकी, फुड टेक्नॉलॉजी आणि बायोटेक्नॉलॉजीसारख्या विषयांतील अभ्यासक्रम आधुनिक काळाच्या गरजेनुसार अद्ययावत झाले नाहीत. प्रयोगशाळा, संशोधन सुविधा आणि औद्योगिक प्रशिक्षणाची कमतरता यामुळे विद्यार्थ्यांचा आत्म विश्वासही कमी झाला आहे.

- कृषी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया नुकतीच संपली आहे. त्यामुळे कमी प्रवेश झालेली किती महाविद्यालये बंद पडतील, याबाबत आताच काहीही सांगता येणार नाही. येत्या काही दिवसांत प्रवेश प्रक्रियेच्या माहितीचा सखोल अभ्यास करण्यात येईल.

**– वर्षा उंटवाल, महासंचालक,**
**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद**

# साळवण देवी रोडवर अवैध व्यवसायांचा सुळसुळाट

## जेसीबीने सरकारी संपत्तीची तोडफोड; संभाजी ब्रिगेड आक्रमक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** श्रीगोंदा शहरातील साळवण देवी मेन रोडलगतच्या मलंग बाबा ट्रस्टच्या जागेवर अवैध व्यवसायांचे जाळे मोठ्या प्रमाणात फोफावले असून, प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. १६ ऑक्टोबरच्या रात्री सुमारे अकरा वाजता अज्ञात व्यक्तींनी जेसीबीच्या साहाय्याने ५४८६ हायवे लगतचा स्टॉप फलक तसेच नगरपरिषदेच्या सार्वजनिक शौचालयाची महिला विभागाची भिंत पाडल्याची धक्कादायक घटना घडली. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या परिसरात गुटखा विक्रेत्यांचा अजब दबदबा असून, पूर्वीही पोलिस उपअधीक्षक संतोष खाडे यांनी छापा टाकून मोठा ऐवज जप्त केला होता. तरीदेखील आजही गुटख्याची




उघड विक्री सुरू आहे. यामुळे शाळकरी मुले, महिला आणि रहिवाश्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. हा प्रकार संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष नाना शिंदे यांच्या निदर्शनास आल्यानंतर, त्यांनी श्रीगोंदा तहसीलदारांना निवेदन सादर करून सदर जेसीबी व गुटखा विक्रेत्यांवर कायदेशीर कारवाई, तसेच सरकारी संपत्तीची तोडफोड करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, मलंग बाबा ट्रस्टच्या जागेवर चिकन दुकाने चालवल्याने परिसरात दुर्गंधी पसरत आहे, तसेच सार्वजनिक टॉयलेट निष्क्रिय झाले असून नगरपरिषदेने त्वरित जमीनदोस्त करून परिसर स्वच्छ करावा, झाडे लावून चौकाचे सुशोभीकरण करण्यासाठी निधी मंजूर करावा अशी मागणी करण्यात आली आहे. अवैध धंदे आणि अस्वच्छतेचा प्रश्न तातडीने निकाली न लावल्यास संभाजी ब्रिगेड रस्त्यावर उतरेल आणि तीव्र आंदोलन छेडले जाईल. असा इशारा शिंदे यांनी दिला आहे. या निवेदनावेळी डॉ. सागर कोथिंबिरी, संदीप कोथिंबीरे, सोनू कोथिंबिरी, बबलू कोथिंबिरी, समीर कोथंबरे यांसह असंख्य नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

द•ख•ल

# जलशुद्धीकरण शाळेत पर्यावरण पूरक दिवाळी साजरी

**अहिल्यानगर :**येथील जलशुद्धीकरण शाळेत प्रथम सत्राच्या समारोपाच्या दिवशी पर्यावरणपूरक दिवाळी कार्यक्रमाचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वहस्ते बनवलेल्या आकाशकंदीलांनी, रंगीबेरंगी पणत्यांनी आणि चॉकलेटच्या कागदांपासून तयार केलेल्या तोरणांनी शाळेची सजावट



करण्यात आली होती. विद्यार्थिनींनी स्वतः सुंदर रांगोळ्या काढून परिसर अधिकच आकर्षक केला.या विशेष उपक्रमात विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सुट्टीत मोठ्या आवाजाचे फटाके न वाजवण्याचे आवाहन करण्यात आले. त्याऐवजी पर्यावरणपूरक उपक्रम पूर्ण करून दिवाळी आनंदाने साजरी करण्यास सांगण्यात आले. 'एक पेड मा के नाम' या उपक्रमांतर्गत लावलेल्या झाडांची देखील काळजी घेण्याचा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागृती, निसर्गसंवर्धन आणि सामाजिक बांधिलकी यांची भावना निर्माण होण्यास मदत झाली. याशिवाय, गरजूंना व वंचितांना मदत करून त्यांची दिवाळीही आनंददायी करण्याचे आवाहन करण्यात आले. सुट्टीच्या काळात विद्यार्थ्यांनी चांगली पुस्तके वाचून आपले ज्ञान वाढवावे, अशी सूचना शिक्षकांनी दिली.या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा दुर्गा हिरणवाळे, शिक्षक संजय बोरुडे, अर्चना बोरुडे तसेच अनेक माता-पालक उपस्थित होते. शाळेच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, विद्यार्थ्यांनी साजऱ्या केलेल्या या पर्यावरणपूरक दिवाळीचा आदर्श इतर शाळांनी देखील घ्यावा, असे मत अनेकांनी व्यक्त केले.

# रुग्णालयात उपचार घेत असलेल्या महिलेच्या दागिन्यांची चोरी

**अहिल्यानगर :** कायनेटिक चौकातील एका खासगी रुग्णालयातून उपचार घेत असलेल्या रुग्ण महिलेचे दागिने कोणीतरी चोरून नेले. ही घटना १२ऑक्टोबर रोजी घडली. विकास पाराजी गिरे (रा.भाबूळगाव, ता. राहुरी) यांनी पोलिसांत फिर्याद दिली. कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विकास गिरे यांच्या पत्नीने विषारी औषध सेवन केल्याने त्यांना उपचासाठी कायनेटिक चौकातील हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते.आयसीयूमध्ये उपचार सुरू असताना पत्नीच्या गळ्यात दागिने होते. मात्र, १२ऑक्टोबर रोजी दुपारी पत्नीच्या गळ्यात दागिने दिसून आले नाही. दागिन्याचा शोध घेतला असता ते मिळून आले नाही. पत्नीच्या गळ्यातील सुमारे ७५हजारांचे दागिने कोणीतरी चोरून नेले, असे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.

# नाशिक चर्च कमिटीकडून करंजी पूरग्रस्तांना मदत

**करंजी :** करंजी ता. पाथर्डी येथे १५ सप्टेंबर रोजी मोठा पाऊस झाला व पुरामुळे अनेक कुटुंबाचे घर संसार वाहून गेले. गाई, गुर, गाड्या, शेत जमीन, फळबागांची वाहून गेल्या. मात्र या काळात अनेकांनी मिळेल त्या ठिकाणी आसरा घेत तात्पुरते संसार उभे केले.



दिवाळी तोंडावर आली आहे आता दिवाळी नेमकी साजरी करायची कुठे आणि कशी या चिंतेने करंजीतील पूरग्रस्त ग्रामस्थ चिंतातुर असतानाच नाशिक येथील संत अंद्रिया चर्च शरणपूर व संत फिलिप चर्च नाशिक रोड या धार्मिक संस्थेकडून सुमारे १०० पूरग्रस्तांना किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी संजय वाघमारे, फिलीप वरा, प्रशांत बनसोडे अभिजीत पवार, दीपक कांबळे, अनिता भंडारी, रॉय मॅडम सचिन पवार, प्रेम कांबळे स्वप्नील साळवे उपस्थित होते. यावेळी बोलताना संजय वाघमारे म्हणाले की नैसर्गिक आपत्ती आली असली तरीही आम्ही या आपत्तीमध्ये सर्व पूरग्रस्त बांधवांना कोणतीही जात-पात धर्म न पाहता माणुसकीच्या माध्यमातून ही मदत करत आहोत. संकट काळात संकटग्रस्तांच्या मदतीला उभे राहणे ही शिकवण येशूने दिलेली असून नाशिक चर्च कायम पुढे राहिले. यापुढेही काही मदत लागल्यास निश्चित केली जाईल असा विश्वासही यावेळी वाघमारे यांनी दिला. यांवेळी माजी सभापती मिर्झा मण्यार, माजी सरपंच सुनील साखरे, करंजी गावचे सरपंच व शिवसेना जिल्हा उपप्रमुख रफीक शेख करंजी चर्च कमिटीचे अध्यक्ष रेवरंड सोनवणे, सेक्रेटरी छगनराव क्षेत्रे, प्रकाश क्षेत्रे, वसंत क्षेत्रे, झुंबर क्षेत्रे, संजय क्षेत्रे सुभाष क्षेत्रे, प्रकाश खंडागळे उपस्थित होते.

# महिला सफाई कर्मचाऱ्यांना साडी व दिवाळी फराळाचे वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** गोरगरिबांची दिवाळी खऱ्या अर्थाने विशाल जाधव यांच्यामुळे साजरी झाल्याचे प्रतिपादन बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर अध्यक्ष जय पाटील यांनी केले. राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच दिवाळी सणानिमित्त विशाल पोपटराव जाधव मित्र परिवाराच्यावतीने (दि:१८) रोजी बारामती नगरपरिषद मधील महिला सफाई कर्मचाऱ्यांना व प्रभाग क्रमांक ५ व १२ मधील गरीब गरजू महिलांना साडी वाटप तसेच मिठाई वाटप करण्यात आले या प्रसंगी पाटील बोलत होते. विशाल पोपटराव जाधव व मित्र परिवाराच्या वतीने देसाई इस्टेट व बारामती परिसरामध्ये समाज हिताची अनेक विधायक कामे केले जातात. कोणत्याही व्यक्तीची अडचण असेल किंवा कोणत्याही व्यक्तीला गरज असेल त्यावेळी विशाल जाधव व मित्र परिवाराच्या वतीने शक्य ती मदत तात्काळ केली जाते. समाजामध्ये एकोपा निर्माण व्हावा तसेच समाजामध्ये महापुरुषांचे विचार रुजावेत म्हणून अनेक महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करून लोकांमध्ये चांगल्या विचारांची देवाण-घेवाण व्हावी




या साठी अविरत कार्य केले जाते. विशाल पोपटराव जाधव व मित्र परिवाराच्या वतीने नेहमीच बारामती नगर परिषदेतील कर्मचाऱ्यांसाठी तसेच समाजातील अनेक लोकांसाठी समाजहिताची व विधायक कामे केली जात असल्याचे आरोग्य निरीक्षक राजेंद्र सोनवणे यांनी सांगितले. या वेळी बारामती शहर सोशल मीडिया उपाध्यक्ष मंगेश गिरमे, मोहिनी जाधव, प्रवीण बोरा, दत्तात्रेय जाधव, सचिन मोरे, सागर मोहिते, कुंदन आवळे, रवींद्र पांडकर, या सह अनेक मान्यवर महिला पदाधिकारी उपस्थित होते.

# 'वृद्धेश्वर' उसाला चांगला भाव देणार : आमदार मोनिका राजळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** चालू हंगामात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना इतर कारखान्याच्या तुलनेत चांगला भाव देण्याचे काम वृद्धेश्वर कारखाना करणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी वृद्धेश्वर कारखान्यालाच ऊस घालून हा हंगाम यशस्वी करावा, असे आवाहन आमदार मोनिका राजळे यांनी केले. वृद्धेश्वर कारखान्याच्या बॉयलर अग्निप्रदीपन सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष रामकिसन काकडे, उद्धव वाघ, राहुल राजळे, नितीन पवार, बापूसाहेब भोसले, सुभाष ताठे, सुभाष बर्डे, अभय आव्हाड, नंदकुमार शेळके, अमोल गर्जे, शेषराव कचरे, बंडूशेठ बोरुडे, बापूसाहेब पाटेकर, काका शिंदे, बंडू पठाडे आदी उपस्थित होते.संचालक नारायण काकडे व नंदा काकडे यांच्या हस्ते अग्निप्रदीपन करण्यात आले. यावेळी आमदार राजळे म्हणाल्या, सर्वांच्या विश्वासाला पात्र असणारा कारखाना म्हणून आपल्या कारखान्याची ओळख आहे. सभासद, शेतकरी यांच्या विश्वासाला कधीही तडा जाणार नाही. नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठे नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या शेतातील माती वाहून गेल्याने कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे. खरडून वाहून गेलेली माती कुठून आणणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. राजळे म्हणाल्या, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीला धावून जाण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीला वृद्धेश्वर उद्योग समूहाने २१ लाख रुपयांची मदत केली आहे. या पद्धतीचा मदत करणारा वृद्धेश्वर हा जिल्ह्यातील पहिला साखर कारखाना आहे. कोणताही कारखाना संचालकांनी चुकीचे निर्णय घेतले, तर बंद पडतो. मात्र, या ठिकाणी दूरदर्शीपणे कारभार करण्याचे काम सर्व संचालक करत आहेत. स्व. दादापाटील राजळे व स्व. राजीव राजळे यांनी दूरदर्शीपणाने या ठिकाणी अधिकारी व कर्मचाऱ्यांची भरती केल्याने मोठा फायदा कारखान्याला होत आहे. मागील हंगामात २७२३ रुपये दर कारखान्याने दिला होता व या वेळीही चांगला दर देण्याचे काम कारखाना करेल, असे शेवटी राजळे म्हणाल्या. प्रास्ताविक सुभाष ताठे यांनी केले. सूत्रसंचालन आर. बी. शेख यांनी, तर आभार राहुल राजळे यांनी मानले.

# इमारती आपल्या त्वचेसारख्या : सुयश परिख

## कोड्सपासून कार्बनपर्यंत: भारत आणि ऑस्ट्रेलिया वेगळं का बांधतात?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर -** इमारती या आपल्या तिसऱ्या त्वचेप्रमाणे असतात; त्या जशा पर्यावरणावर परिणाम करतात, तशाच आपल्या आरोग्यावरही थेट प्रभाव टाकतात, असे प्रतिपादन ऑस्ट्रेलियात सस्टेनेबल आणि ग्रीन बिल्डिंग डिझाईन क्षेत्रात कार्यरत आर्किटेक्ट सुयश परिख यांनी केले.आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर आणि पोलाद स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कोड्सपासून कार्बनपर्यंत: भारत आणि ऑस्ट्रेलिया वेगळं का बांधतात? या विषयावर परिख यांनी प्रेरणादायी व्याख्यान दिले. कार्यक्रमास पोलाद स्टीलचे सुशांत गव्हाणे, आदेश गूंगे, तसेच संस्थेचे प्रदीप तांदळे, भुषण पांडव, सुनिल औटी, संतोष खांडेकर, गौरव मांडगे, संकेत पादिर, सचिन डागा, अनमोल जैन व इतर सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुयश परिख यांनी सांगितले की, इमारती आपल्या आरोग्यावर आपल्या कल्पनेपेक्षा जास्त प्रभाव टाकतात. प्रकाश, हवा, तापमान आणि साहित्य यांची योग्य निवड आरोग्यदायी ठरते. प्रत्येक आराखडा म्हणजे मानवी आरोग्य आणि आरामासाठी लिहिलेली एक वैद्यकीय चिठ्ठी आहे. त्यांनी पुढे सांगितले की, जगातील ऊर्जेच्या आणि कार्बन उत्सर्जनाच्या जवळपास ४० टक्के जबाबदारी बांधकाम क्षेत्रावर आहे. त्यामुळे आर्किटेक्ट, इंजिनीअर्स आणि डेव्हलपर्स यांनी या समस्येच्या ४० टक्के उपायाचा भाग व्हावे, ही काळाची गरज आहे. भारत आणि ऑस्ट्रेलियातील बांधकाम कोड्स, हवामानानुसार रचना, वापरले जाणारे साहित्य आणि बांधकामाची मानसिकता या चार मुद्द्यांवर त्यांनी तुलनात्मक विश्लेषण केले. ऊर्जा कार्यक्षमता, कार्बन नियंत्रण आणि टिकाऊ बांधकाम तंत्रज्ञान या बाबींमधील फरक त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले.

# माजी उपमहापौर गणेश भोसले यांचा मनपा कर्मचाऱ्यांसमवेत दिवाळीचा आनंद साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेचे माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी आपल्या प्रभागातील मनपा कर्मचाऱ्यांसमवेत दिवाळी सण साजरा केला. या प्रसंगी त्यांनी कर्मचाऱ्यांना मिठाई वाटून सणाचा आनंद व्यक्त केला. भोसले म्हणाले, मनपा कर्मचारी हे शहरातील नागरिकांचे खरे दूत आहेत. पहाटेपासून रात्रीपर्यंत आरोग्य, स्वच्छता, दिवाबत्ती, पाणीपुरवठा आदी तातडीच्या सेवा देत ते नागरिकांच्या सेवेत तत्पर असतात. ऊन, पाऊस, वा वारा असो,हे कर्मचारी आपली काळजी न करता नगरकरांच्या सोयीसाठी काम करतात. आपल्या सण-उत्सवाच्या काळात नागरिकांचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी जे कर्मचारी मनापासून काम करतात, त्यांचे योगदान अमूल्य आहे. माझ्या प्रभागातील कर्मचाऱ्यांनी नेहमीच नागरिकांशी



आपुलकीचे, स्नेहपूर्ण आणि ऋणानुबंधाचे संबंध ठेवले आहेत. यावर्षीचा उत्कृष्ट कर्मचारी म्हणून किरण जोदीया यांना पुरस्काराने सन्मानित करत ५००० रुपयांचे रोख पारितोषिक दिले. दिवाळीच्या या निमित्ताने प्रभागातील सर्व विभागातील कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देत त्यांच्या परिश्रमाचे माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी कौतुक केले.

# नवनियुक्त शिक्षकांचे प्रशिक्षण एप्रिल अखेरीस घ्यावे

## शिक्षक भारतीची मागणी:सुनील गाडगे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या नविननियुक्त शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण दिवाळीच्या सुट्टीत न घेता एप्रिल महिन्याच्या अखेरीस आयोजित करावे, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (चडउएठढ), पुणे येथील संचालक राहुल रेखावार यांना याबाबतचे निवेदन शिक्षक भारती संघटनेच्या वतीने देण्यात आल्याची माहिती शिक्षक भरतीचे राज्यसचिव सुनील गाडगे यांनी दिली.निवेदनात म्हटले आहे की, दिवाळी सुट्टी ही शिक्षकांसाठी कौटुंबिक एकत्रतेची आणि मानसिक विश्रांतीची संधी असते. राज्यभर नविन नियुक्त शिक्षक विविध जिल्ह्यांमध्ये कार्यरत असून, त्यांना वर्षभरात केवळ दोनदाच त्यांच्या मूळ गावी जाण्याची संधी मिळते. अशा पार्श्वभूमीवर, शिक्षक भारती संघटनेच्या वतीने करण्यात आलेल्या निवेदनात दिवाळीच्या काळात प्रशिक्षण आयोजित करणे अन्यायकारक असून, त्याऐवजी एप्रिल महिन्याच्या अखेरीस प्रशिक्षण घेण्यात यावे, ही विनंती करण्यात आली आहे. शिक्षक भारती संघटनेचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी सांगितले की, शिक्षक समाज घडवणारा कणा आहे. नविननियुक्त शिक्षकांसाठी प्रशिक्षण अत्यावश्यक असले तरी त्याचे वेळापत्रक मानवतेच्या दृष्टिकोनातून असावे. एप्रिल अखेरीस बहुतेक शाळांचे शैक्षणिक सत्र पूर्ण झालेले असते. त्यामुळे त्या काळात प्रशिक्षण घेतल्यास शिक्षक उपस्थितीही चांगली राहील व त्याचा दर्जाही वाढेल.गाडगे पुढे म्हणाले, सध्या शिक्षकांवर विविध प्रशासकीय जबाबदाऱ्या असतानाच मानसिक तणावही वाढत आहे. सणासुदीच्या काळात शिक्षकांना त्यांच्या कुटुंबासोबत वेळ घालवण्याची गरज असते. म्हणूनच शिक्षक भारती संघटनेच्या वतीने आम्ही विनंती करतो की, चडउएठढ आणि शिक्षण विभागाने सहानुभूतीपूर्वक विचार करून हे प्रशिक्षण एप्रिल अखेरीस आयोजित करावे.या वेळी शिक्षक भारती संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक आप्पासाहेब जगताप भारतीच्या राज्याध्यक्षा रूपाली कुरूमकर यांचा समावेश होता.

# जातपडताळणी समितीकडून कुणबी:मराठा विद्यार्थ्यांवर अन्याय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :**येथील जातपडताळणी समितीकडून सध्या कुणबी-मराठा जातपडताळणी करणाऱ्या विद्यार्थ्यांची पिळवणूक होत असल्याची तक्रार विद्यार्थ्यांकडून होत आहे. रक्तनात्यामधील वडील, भाऊ, बहीण यांच्या पडताळणी होऊनही सध्याच्या अर्जदारांचे प्रकरणे रिजेक्ट केली जात आहेत.यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्हा जातपडताळणी कार्यालयात पडताळणी समितीने कुणबी-मराठा विद्यार्थ्यांची अनेक प्रकरणे रिजेक्ट केली आहेत. पणजोबा,खापर पणजोबा यांची मुलगी,मुलगा मयत झाले त्यांची वारस नोंद मागवून प्रकरण मागे पाठवण्यात येते.घरातील वडील,भाऊ, बहीण, रक्तातील नातेवाईक यांची जातपडताळणी झालेली असताना जास्तीचे कागदपत्रे जोडण्याची गरज नसल्याचे शासनानेच परिपत्रक काढले आहे. मात्र, या निर्णयाला हरताळ फासून जातपडताळणी समितीने प्रकरणे थेट रिजेकट केली आहे. यामुळे मराठा -कुणबी समाजावर मोठ्या प्रमाणावर अन्याय होत आहे.जरांगे, विखे यांच्याकडे करणार तक्रारअहिल्यानगर जिल्हा जातपडताळणी समितीकडून कुणबी मराठा समाजावर अन्याय केला जात असल्याची भावना निर्माण झाली आहे.

# महाराजा महाविद्यालयाच्या कुस्तीपटूंची राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :**दि. १४ ते १६ ऑक्टोबर रोजी त्रिमूर्ती संकुल नेवासा फाटा येथे पार पडलेल्या शालेय राज्यस्तरीय १९ वर्षे मुले व मुली कुस्ती स्पर्धेमध्ये महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील तीन खेळाडू संदीप गायकवाड, श्रुतिका पवार व समीक्षा टोणगे यांनी आपापल्या वजन गटांमध्ये अतिशय उत्कृष्ट आणि उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये मेडल प्राप्त झाले .त्यामध्ये पैलवान संदीप गायकवाड याने ७७ ज्ञस ग्रिको रोमन कुस्ती स्पर्धेत अतिशय छान कुस्त्या करत राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला, त्याची १ नोव्हेंबर ते पाच नोव्हेंबर २०२५ रोजी हरियाणा पानिपत येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धे साठी निवड झाली. तसेच पैलवान श्रुतिका पवार हिने ७६ ज्ञस वजन गटामध्ये सिल्वर मेडल तर पैलवान समीक्षा टोणगे येणे ६२ ज्ञस वजन गटामध्ये ब्रांझ मेडल मिळवले. तीनही खेळाडूंनी अतिशय उत्कृष्ट कामगिरी केली व महाराजा कॉलेज व श्रीगोंदा तालुक्याचे नाव सर्व राज्यस्तरावर गाजवले. सर्व यशस्वी खेळाडूंचे महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माजी




आ. बबनराव पाचपुते, महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य मा. बाबासाहेब भोस, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी आ. राहुल जगताप, मा. महावीर पाठवा, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे साहेब, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव जरे, उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, डॉ.सुदाम भुजबळ, डॉ.नितीन थोरात, पर्यवेक्षक रत्नाकर झिटे, जिमखाना प्रमुख प्रा.रमेश थोरात व प्रा. श्रीकांत थोरात, विभाग प्रमुख प्रा रमेश भुजबळ, प्रा. उषा बोरुडे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, श्रीगोंदा तालुका क्रीडा समिती अध्यक्ष सचिन जामदार, सर्व क्रीडा समिती, विद्यार्थी, पैलवान प्रेमी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. खेळाडूंना क्रीडा शिक्षक संजय डफळ, क्रीडा संचालिका कल्पना बागुल पालक पै. अण्णा गायकवाड, भरत पवार व गोरख टोणगे यांचे मार्गदर्शन लाभले.

# मानवसेवा प्रकल्पाचे दिलीप गुंजाळ यांना पुष्पा नाथानी पुरस्कार प्रदान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर-** रस्त्यावरील बेघर, निराधार आणि मनोरुग्णांच्या पुनर्वसनासाठी आयुष्य वाहिलेल्या सामाजिक कार्यकर्ते तसेच मानवी तस्करीच्या विळख्यात अडकलेल्या ११४ आदिवासी कुटुंबांची मुक्तता करून त्यांच्या ४८ बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणारे दिलीप वसंत गुंजाळ यांना पुष्पा नाथानी पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले.हा पुरस्कार रेलफोर फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने दिला गेला असून, त्यामध्ये दहा लाख रुपये पारितोषिक व मानचिन्हाचा समावेश आहे. रेलफोर फाउंडेशनचे संचालक दीपक नाथानी व सीएसआर प्रमुख नितीन घोडके यांच्या हस्ते गुंजाळ यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी




नाथानी परिवार उपस्थित होता. गुंजाळ यांनी स्थापन केलेले श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ हे अनेक वर्षांपासून समाजातील उपेक्षित घटकांसाठी कार्यरत आहे. या संस्थेच्या माध्यमातून रस्त्यावरील बेघर, निराधार, मानसिक आजारग्रस्त, तसेच समाजाने विसरलेल्या व्यक्तींना अन्न, वस्त्र, औषधोपचार, निवारा आणि सन्मानाने जगण्याचा हक्क मिळवून दिला जात आहे. संस्थेने आजवर तीन हजाराहून अधिक निराधार आणि पिडीत व्यक्तींचे पुनर्वसन करून त्यांना नवजीवन दिले आहे. रेलफोर फाउंडेशनचा पुष्पा नाथानी पुरस्कार हा समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी निःस्वार्थ कार्य करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थेला दिला जातो. यावर्षीचे मानकरी दिलीप गुंजाळ हे त्यांच्या अथक परिश्रमांमुळे आणि संवेदनशीलतेमुळे या पुरस्काराचे खऱ्या अर्थाने पात्र ठरले आहेत. या पुरस्काराद्वारे केवळ त्यांचा गौरव झालेला नाही, तर समाजसेवेची खरी व्याख्या स्वतःसाठी नव्हे, तर इतरांसाठी जगणे! या तत्त्वाची पुनःप्रचिती समाजाला मिळाली असल्याची भावना दीपक नाथानी यांनी व्यक्त केली. दिलीप गुंजाळ म्हणाले की, हा सन्मान केवळ माझा नसून, अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळातील प्रत्येक कार्यकर्त्याचा, संस्थेच्या विश्वस्तांचा आणि समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी कार्य करणाऱ्या प्रत्येक हाताचा आहे. आजवर आम्ही तीन हजारांहून अधिक निराधारांना निवारा, उपचार, पुनर्वसन आणि माणुसकी दिली आहे. एकच तत्त्व नेहमी डोळ्यांसमोर ठेवलं मानवसेवा हीच ईश्वरसेवा! हाच आमच्या कार्याचा आत्मा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# पुण्यात शनिवारवाड्यात नमाज पठण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** शनिवारवाड्यात मुस्लीम मुलींच्या नमाज पठणाची चित्रफित समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे. त्यावरून भाजप संघटना आक्रमक झाली, व पुण्यात वातावरण चांगलेच तापले.पुण्यात ऐतिहासिक शनिवारवाड्यात नमाज पठण झाल्याचा आरोप भाजपच्या खासदार मेधा कुलकर्णी यांनी केला आहे. यानंतर मेधा कुलकर्णी यांच्यासह पतीत पावन संघटनेचे पदाधिकारी आक्रमक झाले. या परिसरात असलेल्या मजारवरुन मेधा कुलकर्णी आणि इतर हिंदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते आक्रमक झाले. त्यांच्याकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात येत आहे. आंदोलकांकडून परिसरात गोमुत्र शिंपडून जागा स्वच्छ करण्यात आल्याचा दावा करण्यात आला. तसेच यापुढे असं कृत्य खपवून घेतलं जाणार नाही, असं भाजप खासदार मेधा कुलकर्णी म्हणाल्या. यानंतर परिसरात असणाऱ्या एका मजारच्या विरोधात हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या. ही मजार हटवा, अशी मागणी आंदोलकांकडून करण्यात आली. परिसरातील तणावाचं वातावरण पाहता पोलिसांचा मोठा फौजफाटा परिसरात तैनात आहेत. पोलिसांकडून



## हिंदुत्ववादी संघटना आक्रमक

आंदोलकांची समजूत काढण्याचे प्रयत्न सुरु आहेत. पण आंदोलकांकडून जोरदार घोषणाबाजी केली जात आहे. ''या ठिकाणी गोष्ट घडलेली आहे. हा व्हिडीओ खरा आहे. जिथे आम्ही उभे आहोत इथेच तो प्रकार घडलेला आहे. त्यामुळे आम्ही सर्वांनी निर्णय घेतला आहे की, ज्या ठिकाणी नमाज पठण झालं त्या जागेचं शुद्धीकरण आपण शिववंदना करुन करणार आहोत. आपण इथे जमलात म्हणून मी आपल्या सर्वांचं अभिनंदन करते. अशीच हिंदू शक्ती एकवटून आपण पुढच्या काळात जी काही संभाव्य आक्रमण असतील त्यांचा प्रतिकार केला पाहिजे'', अशी भूमिका मेधा कुलकर्णी यांनी मांडली.''हे आपलं ऐतिहासिक ठिकाण आहे. मराठा साम्राज्याचा विस्तार अटकेपार झाला. तो राज्य कारभार ज्या केंद्रातून चालवला गेला ते ऐतिहासिक ठिकाण शनिवारवाडा हे आमच्या विजयाचं प्रतिक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराजाची स्थापना केली आणि मुघलांचा नाश केला. तेच इथे येऊन नमाज पढत असतील तर आमचं त्यांना आवाहन आहे, तुम्ही नाइलाजास्तव आपला स्वत:चा हिंदू धर्म सोडून धर्मांतर केलं असेल तर तुम्ही पुन्हा हिंदू धर्मात परत या. अन्यथा तुम्हाला त्याच धर्मात राहायचं असेल तर तुम्ही तुमच्या घरी किंवा मशिदीत नमाज पठण करा'', असे मेधा कुलकर्णी म्हणाल्या.''अशा सार्वजनिक ठिकाणी प्रामुख्याने आमच्या ऐतिहासिक ठिकाणं ताब्यात घेण्याचं काम केलं तर इथून पुढे खपवून घेतलं जाणार नाही. आता कायद्यात बदल झालेला आहे. हे इथून पुढे आम्ही चालू देणार नाहीत. त्यासाठी आम्ही इथे आलो आहोत. पूर्वी इथे माघी गणेशोत्सव व्हायचा. तो पुन्हा सुरु करावा, अशी मागणी मी पुरातत्व खात्याकडे केली आहे'', अशी माहिती मेधा कुलकर्णी यांनी दिली.''यापुढे असले कुठले अवैध धंदे या ठिकाणी होणार नाही. केवळ हिंदू धर्म या ठिकाणी चालेल. जसे सारसबागेत काही गोष्टी चालत होत्या ते आपण बंद पाडल्या. तसेच इथल्या गोष्टी आपण पाडणार आहोत.

---

द•ख•ल

## दिवाळीनिमित्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सहभागी करत चहापान कार्यक्रम

**माळशिरस :** दिपावलीच्या निमित्ताने बँक ऑफ इंडियाच्या सासवड शाखेने काहीं सेवानिवृत्त कर्मचारी बंधूंना शाखेत निमंत्रित करून भेट वस्तू व चहापान केले. विलास मोकाशी, रमेश कानडे, सुनील रासकर, दत्तात्रय शेटे, मंजुश्री निरगुडे, दिलीप गीते व हेमंत ताकवले



ही सेवानिवृत्त मंडळी या प्रसंगी उपस्थित होती शाखाधिकारी सचिन दोलताडे यांनी सर्वांचे स्वागत केले तर नीता पाटील यांनी मनोगतातून शुभेच्छा दिल्या रश्मी बंडे, दीपा , ऐश्वर्या काळे, नगमा शाहीन, दिपा कुमारी, पल्लवी गौरकर,गुरुप्रसाद सुतार, विकास जगताप, उत्कर्ष सुतार, नामदेव कामथे आदी स्टाफ या प्रसंगी उपस्थित होता. एका आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाबद्दल सर्वांनीच आनंद व्यक्त केला. सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी परिचय व आपले अनुभव व्यक्त केले. एक सुंदर आणि कौटुंबिक स्वरूपातील हा सोहळा सर्वांनाच आनंद देऊन गेला.

## दिवाळी सुट्टीत लहान मुलांची बिबट्यांपासून काळजी घ्या

**तळेगाव ढमढेरे:** पुणे जिल्ह्यातील अनेक ठिकाणी बिबट्यांच्या हल्ल्यांच्या घटना घडत असताना सध्याच्या दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये लहान मुलांची बिबट्यांपासून विशेष काळजी घेण्याचे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे. शिरुर तालुक्यातील अनेक गावांसह आंबेगाव, मंचर, जुन्नर, खेड तालुक्यात वन्यप्राणी



व बिबट्यांचा मोठ्या प्रमाणात वावर असून काही लहान मुलांवर बिबट्यांचे हल्ले झालेले आहे, नुकतेच दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे अनेक लहान मुले मामाच्या गावासह आपल्या गावी येत असतात मात्र नागरिकांनी बिबट प्रवण क्षेत्रात लहान मुलांना एकट्याला घराबाहेर पडून देऊ नये, बिबट प्रवण क्षेत्रात लहान मुलांना शेतात तसेच जनावरे चारायला जाताना सोबत घेऊन जाऊ नये, घरच्या आजूबाजूला झुडपे, ऊस असेल तर काळजी घ्यावी, वाड्या, वस्त्या शेतात घर असलेल्या नागरिकांनी लहान मुलांना मोबाईल देऊन घराबाहेर खेळत बसवू नये, लहान मुलांवर विशेष लक्ष देऊन वन्य प्राणी व बिबट्या बाबत कोणतीही अफवा पसरवू नये असे आवाहन करत वन्य प्राणी व बिबट्या बाबत वनविभागाला माहिती द्यावी असे आवाहन वनविभागाच्या वतीने नागरिकांना करण्यात आले आहे.

## कारेगावात पोलिसांच्या कोंबिग ऑपरेशनमध्ये पाच किलो गांजा जप्त

**तळेगाव ढमढेरे:** कारेगाव (ता. शिरुर) येथे पोलिसांच्या कोंबिंग ऑपरेशन दरम्यान पोलिसांना पाहून दरवाजा लावल्याने इसमाच्या चांगल्यास अंगलट आले असून संशय आल्याने पोलिसांनी घरात तपासणी केली असता चक्क पाच किलो गांजा मिळून आल्याची घटना घडली असून पोलिसांनी तिघांना गांजाच्या साठ्यासह जेरबंद केले आहे.कारेगाव (ता. शिरुर) परिसरात पोलीस उपनिरीक्षक अविनाश थोरात, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय शिंदे, पोलीस शिपाई योगेश गुंड, किशोर शिवणकर हे परिसरात रेकॉर्ड वरील गुन्हेगारांबाबत कोंबिंग ऑपरेशन राबवत गस्त घालत असताना फलके मळा परिसरात एका इसमाने पोलिसांना पाहून लपून संशयितपणे दरवाजा लावून घेतल्याने पोलिसांनी सदर घराचा दरवाजा वाजवून घरात पाहणी केली ,असता घरात काड्यांचे तुकडे पडलेले व उग्र वास येत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आल्याने घराची झडती घेतली असता घरामध्ये एक महिला व दोन इसम असल्याचे आणि दोन गोणीमध्ये गांजा असल्याचे दिसून आल्याने पोलीस देखील हादरून गेले, दरम्यान पोलिसांनी याबाबतची माहिती पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांना देत सदर घरातील गांजा साठा जप्त करत तिघांना ताब्यात घेतले, याबाबत पोलीस शिपाई किशोर उत्तम थेऊरकर (वय ३४ वर्षे रा. कारेगाव ता. शिरुर जि. पुणे) यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी जोशी लगत सोलंकी (वय ३४ वर्षे), अमित रमेश डावर (वय ३० वर्षे) , कल्पना जोशी सोलंकी (वय ३२ वर्षे) (सध्या रा. फलके मळा कारेगाव ता. शिरुर जि. पुणे, मूळ रा. दुगाणी ता. वरळा जि. बडवानी मध्यप्रदेश) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार अभिमान कोळेकर हे करत आहे.

---

## बारामती पालिकेचे कंत्राटी कर्मचारी दिवाळी बोनसपासून वंचित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** येथील नगर परिषद मधील कंत्राटी कर्माऱ्यांना दिवाळी बोनसपासून ठेकेदाराने अद्याप वंचित ठेवल्याचे चित्र समोर आले आहे. आता नुसत्या निव्वळ पगारात अर्थात ८ ते ९ हजारात दिवाळी कशी साजरी करायची असा प्रश्न कंत्राटी कर्मचाऱ्यांना पडला आहे.अनेक सहकारी संस्था, कंपनी, दुकाने, कारखाने तसेच इतर ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिवाळीला बोनस दिला आहे. मात्र बारामती नगरपरिषद मधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना ठेकेदाराने वंचित ठेवले आहे. ठेकेदाराने फक्त आपला खीसा कडक ठेवण्याची भूमिका ठेवली आहे का अशा प्रश्न उपस्थित राहू लागला आहे. आपला परिसर स्वच्छ सुंदर



ठेवण्यासाठी नगर परिषदेतील हे कर्मचारी अहोरात्र- दिवस कष्ट करत असतात. आज यांच्या मेहनतीमुळे स्वच्छ सर्वेक्षण मद्ये बारामती नगर परिषदेने नंबर पटकवला आहे. यांच्यासाठी काही तरी देण लागत. आणि ते द्यावे लागते. आम्ही या पगारत दिवाळी कशी साजरी करायची अशी खंत पालिकेतील कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे. कामगारांना विविध कंपन्यांनी सानुग्रह अनुदान बोनस दिला आहे. मात्र कंत्राटी कामगारांनाही काही ठेकेदार बोनस देतात. परंतु, तो बोनस फार कमी असतो. अगदी पाच ते दहा हजार रुपये देतात. काही कंपन्यांकडून कामगारांना बोनस मिळायचा आहे.बोनस ही कर्मचाऱ्याला, कामगाराला त्याच्या नियमित पगाराव्यतिरिक्त दिली जाणारी अतिरिक्त रक्कम आहे असे म्हटले जाते. कंपनी, ठेकेदार संस्था, ठेकेदार ज्यांच्याकडे वीस पेक्षा जास्त कामगार आहेत. ते बोनस व सानुग्रह अनुदानासाठी पात्र असतात. कायद्यानुसार १ एप्रिल ते ३१ मार्च हे आर्थिक वर्ष संपल्यानंतर आठ महिन्यांच्या आत कर्मचाऱ्यांना बोनस द्यावा लागतो. जास्तीत जास्त बोनस कशी देईल यासाठी प्रयत्न करतात. कायम कामगारांना बोनस, बक्षिसी मिळते. कंत्राटी कामगारांना मात्र बोनसपासून वंचित ठेवले जाते ही वस्तुस्थिती आहे. इतक्याशा पगारात दिवाळी कशी साजरी करायची. ठेकेदाराने कंत्राटी कर्माऱ्यांना बोनस द्यावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## वाढदिवसाचा खर्च टाळून अनाथालयास मदत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**भोर :** तालुक्यातील गुंजण मावळ खोऱ्यातील माळेगाव येथील माऊली अनाथ आधार आश्रमातील गरजू विद्यार्थ्यांना एक महिना पुरेल एवढे किराणा माल साहित्याचे वाटप करण्यात आले . भोर तालुक्यातील यशस्वी उघोजक व सद्गुरू सेवा ट्रस्टचे



अध्यक्ष विनोद बोडके यांच्या वाढदिवसाचे औचित्याने गरजू मुलांना किराणा साहित्याचे वाटप केल्याचे आम्ही भोरकर प्रतिष्ठान सामाजिक संघटनेचे अध्यक्ष समीर घोडेकर यांनी सांगितले. माऊली अनाथ आश्रम येथील तब्बल ७० विद्यार्थ्यांना किराणा साहित्य देण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपले भविष्य उज्वल घडवावे व यशस्वी लोकांचे आदर्श डोळ्यापुढे ठेवून त्यांची प्रेरणा घेत वाटचाल करावी असे मत यावेळी उद्योजक विनोद बोडके यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी गुणवंत प्रशासकीय अधिकारी व यशस्वी उद्योजक यांसारखे घडण्याचे स्वप्न पाहिले पाहिजे. त्या स्वप्नांसाठी प्रामाणिक अभ्यास केला पाहिजे असे समीर घोडेकर यांनी मत व्यक्त केले. माऊली अनाथ आधार आश्रमाचे रोहित महाराज गोरड यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करत संस्थेची माहिती दिली. ह. भ. प. नवनाथ महाराज यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.याप्रसंगी भोर तालुका केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष सागर सोंडकर, आम्ही भोरकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष समीर घोडेकर , फायटर स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष सुरज आवाळे , सेवानिवृत्त शिक्षक सुरेश बोडके, सुनंदा बोडके, सुदाम मोरे, दिलीप शिळीमकर, आर्यन गोरड, निशांत जाधव , शांताराम पिलावरे आदीसह विद्यार्थी उपस्थित होते.

## चित्तथरारक नृत्य सादर करत टी.सी. महाविद्यालयाचा प्रथम क्रमांक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** गुजरात राज्यातील अहमदाबाद येथे संपन्न झालेल्या 'सामवेद कला महोत्सव – २०२५' या राष्ट्रीय लोकनृत्य स्पर्धेत अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती येथील सांस्कृतिक विभागाने सादर केलेल्या 'देवली' या लोकनृत्याला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. या स्पर्धेत भारतातील विविध राज्यांमधून एकूण ९८ संघ सहभागी झाले होते.



महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी डोक्यावर समई संतुलित ठेवून सादर केलेल्या या चित्तथरारक नृत्यप्रस्तुतीने प्रेक्षकांची मने जिंकली. भारतासह गुजरात राज्यातील स्पर्धक आणि प्रेक्षकांनी या नृत्याला उभे राहून उत्स्फूर्त दाद दिली.या स्पर्धा अहमदाबाद येथील श्यामप्रसाद मुखर्जी सभागृहात संपन्न झाल्या. या यशामागे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांचे मार्गदर्शन तसेच प्रा. भीमराव तोरणे, प्रा. सोमनाथ कदम यांचे विशेष परिश्रम आहेत. या उल्लेखनीय यशाबद्दल अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर), सचिव मिलिंद राजकुमार शाह (वाघोलीकर) तसेच प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी सांस्कृतिक विभागाचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

## दिवाळीच्या प्रकाशात रंगले इच्छुक भावी नगरसेवकांचे जनसंपर्क

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** अलंकापुरीनगरीत दिवाळीच्या प्रकाशात राजकारणाचा रंग अधिक खुलू लागला आहे. येऊ घातलेल्या आळंदी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक नगरसेवकांनी सणाचा आनंद आणि जनसंपर्क यांचा सुरेखदिवाळीचा मेळ साधत नागरिकांशी संवाद साधण्यास सुरुवात केली आहे. पारंपरिक दिवाळी भेटीगाठींच्या निमित्ताने उमेदवारांनी आपल्या प्रभागातील नागरिकांशी प्रत्यक्ष संपर्क साधत आशीर्वाद, शुभेच्छा आणि पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरातील प्रत्येक गल्लीत, रस्त्यावर आणि चौकात शुभेच्छा बॅनर, पोस्टर आणि फलक झळकत आहेत. अनेक इच्छुक उमेदवारांनी घराघरांत जाऊन नागरिकांना शुभेच्छा देतानाच त्यांच्या स्थानिक समस्या, विकास कामांची गरज आणि अपेक्षा जाणून घेतल्या. काही ठिकाणी नागरिकांच्या अडचणींवर त्वरित तोडगा काढण्याचे आश्वासन देत उमेदवारांनी आपला जनसंपर्क अधिक दृढ केला आहे. दिवाळी निमित्ताने अनेक सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक उपक्रमांचे आयोजन करून इच्छुकांनी आपली उपस्थिती ठळकपणे जाणवून दिली. अनेक इच्छुक उमेदवार स्वतःचे माहीतीपत्रक, दिवाळी भेट, आकाशकंदील, उटणे, पणत्या, मिठाई, दिवाळी फराळ वाटप नागरिकांना करत आहे. तर कुठे बचत गट महिलांचा सन्मान अशा विविध उपक्रमांतून जनतेशी जोडलेपण वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे. दरम्यान, दिवाळीच्या निमित्ताने शहरात झालेल्या दिवाळी पहाट, सांस्कृतिक कार्यक्रम आणि कीर्तन सोहळ्यांनाही राजकीय रंग चढला आहे. इच्छुक नगरसेवकांनी या कार्यक्रमांत हजेरी लावत नागरिकांशी थेट संवाद साधला. या भेटीगाठींमुळे राजकीय वातावरण अधिक तापू लागले असून, आगामी निवडणुकीची चाहूल प्रत्येक नागरिकाला जाणवू लागली आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सणाच्या या उत्सवी वातावरणात उमेदवारांच्या संवादामुळे स्थानिक प्रश्नांवर चर्चा होण्याची संधी मिळत आहे. रस्ते, पाणीपुरवठा, वाहतूक, कचरा व्यवस्थापन आणि विकास आराखड्यांबाबत नागरिक आपली मते मांडत आहेत. दिवाळीचा प्रकाश जसा शहर उजळवतो आहे, तसाच राजकीय वातावरणालाही उजाळा मिळाला आहे. इच्छुक उमेदवारांनी शुभेच्छा कार्यक्रमांच्या माध्यमातून६ निवडणुकीच्या रणांगणात प्रवेश करण्याचे संकेत दिले आहेत.



## करंदीच्या साबळे कुटुंबाने आईचे देहदान करत जिवंत ठेवल्या स्मृती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे:** मी जिवंत असताना सर्वांच्या उपयोगी पडले मात्र माझ्या मृत्यनंतर देखील माझे शरीर कोणाच्यातरी कामी यावे हि आईची असलेली इच्छा पूर्ण करण्यासाठी शिरुर तालुक्यातील साबळे कुटुंबीयांनी आपल्या आईचे अवयव व देहदान करुन मानवतेचा खरा अर्थ दाखवत आदर्श निर्माण केला आहे. करंदी (ता. शिरुर) येथील सरस्वती व कोंडीबा साबळे या दांपत्याचे

### साबळे कुटुंबाचा समाजाने आदर्श घ्यावा

तहसीलदार बाळासाहेब म्हस्केकरंदी येथील साबळे कुटुंबीयांनी घेतलेला निर्णय नक्कीच प्रेरणादायी असून कुटुंबाच्या निर्णयामुळे अनेकांना न मिळणारे अवयव मिळाल्याने जीवदान मिळून एक माता शरीराने जिवंत राहणार असून साबळे कुटुंबाचा समाजाने आदर्श घ्यावा असे मत तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी व्यक्त केले.

शेतकरी कुटुंब दोघे पतीपत्नी नेहमी सर्वांच्या सुख दुखासह विविध कामी मदतीला तत्पर असत, आपल्या आई वडिलांचा आदर्श घेऊन त्यांचे चिरंजीव महेश साबळे व सून पोलीस पाटील वंदना साबळे या देखील सामाजिक कार्यात सक्रीय झाले, तर माझे शरीर शेवटच्या क्षणी देखील कोणाच्यातरी उपयोगी पडावे अशी इच्छा सरस्वती साबळे यांची असल्याने



त्यांनी जगदगुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या प्रेरणेतून २०११ मध्ये अवयवदान व देहदान बाबत नोंदणी केली होती, नुकतेच १७ ऑक्टोबर रोजी सरस्वती साबळे यांचे निधन झाले असता साबळे कुटुंबीयांनी आपल्या आईच्या इच्छेचा मान राखत अवयवदान आणि देहदानाचा निर्णय घेत डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज हॉस्पिटल व रिसर्च सेंटर पुणे येथे आपल्या आईचे अवयव व देहदान केले. यावेळी सरस्वती यांचे पती कोंडीबा साबळे, मुलगा महेश , सून वंदना साबळे, मुलगी कल्पना झुरुंगे व नूतन भूमकर आदी उपस्थित होते.तर साबळे कुटुंबियांच्या या निर्णयामुळे गरजू रुग्णांना नवे जीवन मिळून वैद्यकीय विद्यार्थ्यांना शरीरशास्त्र शिकण्यास मोठी मदत होणार असताना सदर हॉस्पिटल प्रशासनाकडून तातडीने नेत्रदान करुन घेत दोघांना दृष्टी देण्याबाबतची शस्त्रक्रिया राबवण्यात आली, तर यावेळी बोलताना आमच्या आईमुळे अनेकांना जीवदान मिळणार असल्याचा अभिमान असून शक्य असल्यास पुढील काळात आमच्या आईच्या अवयव दामनातून जेथे स्मृती असतील तेथे आम्ही कुटुंबीय भेट देणार असल्याचे महेश साबळे यांनी सांगितले तर शिरुर तालुक्यातून साबळे कुटुंबियांच्या या आदर्श निर्णयाचे स्वागत होत आहे.


## निविदा नोटीस

### ग्रामपंचायत श्री क्षेत्र महाळुंगे (इं.), ता. खेड, जि. पुणे

ग्रामपंचायत महाळुंगे (इं.) ता. खेड, जि. पुणे हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या सीलबंद निविदा पाकीट व वस्तु कोटेशन पध्दतीने मागविण्यात येत आहे. निविदा ग्रा.पं. श्री क्षेत्र महाळुंगे ता. खेड, जि. पुणे यांचेकडून दि. २०.१०.२०२५ ते २९.१०.२०२५ पर्यंत दुपारी ०२.०० वाजेपर्यंत कोऱ्या निविदा देण्यात येतील. व भरुन पाठविलेल्या मोहोरबंद निवाद याच कालावधीत १०.०० ते ०५.०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. व शक्य झाल्यास शेवटच्या दिवशी सायं. ०५.०० वाजता उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निधीस्तर | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी |
|---|---|---|---|---|---|
| १. | महाळुंगे येथे समाजमंदीर आणि कंपाऊंड वॉल दुरुस्ती आणि रंगकाम करणे. | ग्रामनिधी | ४,९९,८१५/- | ४,९९८/- | ५००/- |
| २. | महाळुंगे येथे जेष्ठ नागरिक ग्रंथालय परिसर कपाऊंड वॉल दुरुस्ती करणे. | ग्रामनिधी | १,०६,६०८/- | १,०६६/- | ५००/- |
| ३. | महाळुंगे येथे जेष्ठ नागरिक ग्रंथालय परिसर पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | ग्रामनिधी | ४,६४,८५१/- | ४,६४८/- | ५००/- |
| ४. | महाळुंगे समाजमंदिर येथे स्वच्छतागृह बांधणे. | ग्रामनिधी | ३,०३,२७४/- | ३,०३२/- | ५००/- |
| ५. | महाळुंगे गावठाणे ते वाडीवस्ती रस्ता २ दुरुस्ती करणे. | ग्रामनिधी | ४,९८,२४६/- | ४,९८२/- | ५००/- |
| ६. | महाळुंगे गावठाणे ते वाडीवस्ती रस्ता ३ दुरुस्ती करणे. | ग्रामनिधी | ४,९९,१२२/- | ४,९९१/- | ५००/- |
| ७. | छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज पुर्णाकृती शिल्प खरेदी करणे व प्रशासकीय इमारतीत बसविणे. | ग्रामनिधी | | | |

टीप :१) कोणत्याही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकारी ग्रा.पं.ने राखुन ठेवला आहे. २) कोणतीही निविदा कारण न देता रद्द अथवा फेरबदल करण्याचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवला आहे. ३) सदर निविदा बंद लिफाफ्यामध्ये आवश्यक आहे. ४) सोबत पुढील कागदपत्रे आवश्यक आहे. (अ. नोंदणी प्रमाणपत्र, ब. जीएसटी रजीस्ट्रेशन, क. पॅनकार्ड)

सही/-
ग्रामसेवक
ग्रामपंचायत महाळुंगे (इं.)
ता. खेड, जि. पुणे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत महाळुंगे (इं.)
ता. खेड, जि. पुणे

# ‘अरुणोदय’कडून दूध उत्पादक शेतकऱ्यांना लाभांश वाटप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मिरजगाव ::** कर्जत तालुक्यातील टाकळी खंडेश्वरी येथील अरुणोदय मिल्क अँण्ड मिल्क या संस्थेच्या वतीने दिपावली निमित्त दुध उत्पादक शेतकरी सभासदांना तब्बल ३० लाख रुपयांचा बोनस वाटप व दिपावली फराळ कार्यक्रम नुकताच पार पडला. संस्थेचे अध्यक्ष अमोल पाटील व किरण पाटील यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबवण्यात आला असून यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आहे. संस्थेमध्ये दररोज सुमारे ५हजार लिटर दूध संकलन होत असून, प्रति लिटर एक रुपया चाळीस पैसे इतका बोनस देण्यात आला आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दुध उत्पादकांना लाभांश वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता खासदार निलेश लंके, कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार, युवा आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा डॉ.जयश्रीताई बाळासाहेब थोरात तसेच ज्ञानदेव वाफारे, चिंचोली काळदातचे सरपंच बापूसाहेब काळदाते, तात्यासाहेब ढेरे, बळीराम यादव, संजय तोरडमल, भाऊसाहेब तोरडमल, नागेश जाधव, जयसिंग थेटे, धनंजय मते, सचिन निंबोरे, पप्पू धुमाळ, देवराव तांबे, अशोक धांडे, मुबारक मोगल, संतोष भोसले यांच्यासह दूध



उत्पादक शेतकरी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते आमदार रोहित पवार म्हणाले, आजचे सरकार शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी पुसत आहे. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये देण्यात यावेत ही आमची मागणी आहे राज्य सरकार शेतकऱ्यांच्या जीवनाशी खेळत आहे. शेतकरी राजा अडचणी सापडला असून त्याला मदत मिळणे गरजेचे आहे. टाकळी खंडेश्वरी ग्रामपंचायतीचे सरपंच अमोल पाटील आणि किरण पाटील यांनी शेतकऱ्यांचे अडचणी ओळखून दिवाळीच्या मुहूर्तावर दिलेला बोनस हा दुध उत्पादक शेतकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने दिलासा देणारा ठरला आहे. तर खासदार लंके म्हणाले, शेतकऱ्यांच्या परिश्रमाचे मोल आणि त्यांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचा माझा संकल्प अधिक दृढ झाला आहे. दूध उत्पादकांचा सन्मान आणि त्यांच्या श्रमाला न्याय मिळवून देणं हेच आमचं ध्येय आहे. आज देशात आणि राज्यात शेतकरी विरोधी सरकार सत्तेवर आहे. मात्र टाकळी खंडेश्वरीसारख्या ग्रामीण भागात या संस्थेने दाखवून दिले की, सहकाराच्या माध्यमातूनही शेतकऱ्यांचा दिवाळीचा सण गोड करता येतो. जयश्री थोरात म्हणाल्या, देशात धर्म, जात या विषयांवर फूट पाडली जात असताना अरुणोदय संस्थेने समाजापुढे आदर्श ठेवला आहे. समानतेचा आणि सहकाराचा आदर्श ठेवणारी ही संस्था एवढ्या मोठ्या प्रमाणात बोनस देणारी असून ही दुर्मिळ घटना आहे. सहकार हा शेतकरी हिताचा असतो. दूध धंदा शेतकऱ्यांचा मुख्य व्यवसाय आहे. अरूणोदय मिल्क नेहमीच शेतकरी हिताचा विचार करत आले आहे. सहकार टिकायला हवा. आणि सहकार टिकण्यासाठी आपण सर्वांनी काम केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. संस्थेचे अध्यक्ष अमोल पाटील म्हणाले, मागील आठ वर्षांपासून हा उपक्रम सुरू आहे. वर्षभर कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांना दिवाळीच्या मुहूर्तावर थोडा दिलासा मिळावा, यासाठी आम्ही हा उपक्रम राबवतो. अतिवृष्टीमुळे शेतकरी संकटात असताना आम्ही त्यांच्या चेहऱ्यावर हास्य आणू शकलो, हीच आमच्यासाठी खरी दिवाळी आहे. किरण पाटील म्हणाले, दिवंगत अण्णासाहेब ढोबे यांनी सहकाराचा आदर्श घालून दिला आहे. संस्थेमध्ये शेतकऱ्याच्या हिताला प्राधान्य देण्याची परंपरा ४५ वर्षांपासून टिकवली आहे. आणि यापुढे देखील ही परंपरा कायमच सुरू राहील, असे यावेळी त्यांनी सांगितले.

## दखल

## गुरुकुलच्या विद्यार्थ्यांची उपेक्षित बालकांसोबत दिवाळी

**अहिल्यानगर :** खरा आनंद तोच, जो वाटल्याने वाढतो, या भावनेला उजाळा देत केडगाव येथील जैनाचार्य श्री शिवमुनीजी गुरुकुल (जे.एस.एस.) येथील विद्यार्थ्यांनी या वर्षीची दिवाळी उपेक्षित व अनाथ मुलांसोबत साजरी करून समाजात एक सकारात्मक संदेश दिला. गुरुकुलच्या मैदानावर आयोजित दिवाळी सेलिब्रेशनमध्ये तपोवन रोडवरील बालगृह प्रकल्पातील मुलांना सहभागी करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या बालमित्रांना फराळ, भेटवस्तू, कपडे, अन्नधान्य आणि किराणा साहित्य देऊन सणाचा आनंद द्विगुणित केला. या उपक्रमाचे आयोजन प्राचार्य आनंद कटारिया व प्राचार्या निकिता कटारिया यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी निखिल बेद्रे, अक्षय नायडू, वैशाली देशमुख, हर्षा कार्ले, बिना आरवडे, अनुपमा तोडमल, योगिता पाठक आदी शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी घरून आणलेला फराळ व भेटवस्तू बालगृहातील मुलांना दिल्या. त्या स्वीकारताना मुलांच्या चेहऱ्यावर झळकलेला आनंद पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. दोन्ही शाळांतील विद्यार्थ्यांनी एकत्र खेळ, गाणी, नृत्य आणि सामूहिक उपक्रमांद्वारे सणाचा आनंद लुटला. प्राचार्य आनंद कटारिया म्हणाले, आजच्या पिढीने फक्त सण साजरा न करता समाजातील दुर्बल घटकांपर्यंत आनंद पोहोचवावा. फटाक्यांवर पैसा खर्च करण्यापेक्षा, तोच पैसा कुणाच्या जीवनात प्रकाश आणण्यासाठी वापरावा. प्राचार्या निकिता कटारिया यांनी सांगितले की, शिक्षण केवळ पुस्तकी न राहता जीवनमूल्यांचा अनुभव देणारे असावे. उपेक्षित मुलांबरोबर दिवाळी साजरी केल्याने विद्यार्थ्यांमध्ये सहानुभूती व सामाजिक जाणीव विकसित होते. या उपक्रमासाठी समस्त हिंदू बांधव संघटनेच्या जिल्हाध्यक्षा ज्योती वाघस्कर, उपाध्यक्ष शितल दळवी व रुक्मिणी ठोंबरे यांचे विशेष सहकार्य लाभले. बालगृह प्रकल्पाचे संचालक युवराज गुंड यांनी गुरुकुल परिवाराचे मनःपूर्वक आभार मानले. ही अनोखी दिवाळी साजरी करताना विद्यार्थ्यांनी दाखवले की ` प्रकाशाच्या उत्सवाचा खरा अर्थ म्हणजे इतरांच्या जीवनातही उजेड पसरवने.

## श्रीगोंद्यात पिसाळलेल्या कुत्र्याने चार जणांना घेतला चावा : दोघांची प्रकृती गंभीर

**श्रीगोंदा :** शहरात रविवारी दिवाळी सणाच्या खरेदीची लगबग सुरू असताना पिसाळलेल्या कुत्र्याने चार नागरिकांना चावा घेतल्याची धक्कादायक घटना घडली. यामध्ये दोघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळाली आहे. पहिली घटना शहरातील एका हॉटेलसमोर घडली असून दुसऱ्या व्यक्तीला दुकानात चढत असताना कुत्र्याने चावा



घेतला. तसेच रस्त्यावरून जाणाऱ्या आदिवासी समाजातील एका व्यक्तीला आणि त्यांच्या मुलालाही चावा घेतल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेत पेडगाव येथील नवनाथ सुदाम मोहिते, नवनाथ नगर येथील युवराज राजू बिबे, तसेच आदिवासी समाजातील दोन व्यक्ती जखमी झाले आहेत. राजू पाटील मोटे यांनी युवराज बिबे यांना खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले नंतर सर्वांना श्रीगोंदा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल, नगर येथे हलवण्यात आले आहे. नागरिकांचा आरोप आहे की, श्रीगोंदा नगरपरिषदेने मोकाट कुत्रे व जनावरांवर नियंत्रणासाठी कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही. योग्य वेळी कारवाई झाली असती, तर अशी वेळ आली नसती. देशभरात, विशेषतः महाराष्ट्रात मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचे प्रमाण वाढले असून लहान मुले आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष नाना शिंदे यांनी उद्या मुख्याधिकारी भगत मॅडम यांची भेट घेऊन नगरपरिषदेने आतापर्यंत काय कारवाई केली याबाबत जाब विचारण्याचे सांगितले आहे. तसेच संभाजी ब्रिगेडच्या वतीने निवेदन देण्यात येणार आहे.

## शेवगांव-पाथर्डीतील शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी २०८ कोटींची मदत : आ. मोनिका राजळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर:** गत महिन्यात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे शेवगांव आणि पाथर्डी तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. पिके, शेती, घरे, दुकाने आणि पशुधनाचे झालेले नुकसान लक्षात घेऊन महायुती सरकारने शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळत नुकसान भरपाईचा पहिला टप्पा जाहीर केला आहे. या अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यासाठी एकूण ८४६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, त्यापैकी शेवगांव व पाथर्डी तालुक्यातील १ लाख ८५ हजार शेतकऱ्यांना २०८ कोटी रुपयांची मदत मंजूर झाली असल्याची माहिती आमदार मोनिका राजळे यांनी दिली. शासन निर्णयानुसार पाथर्डी तालुक्यातील १,०७,६४३ शेतकऱ्यांना १०१ कोटी २९ लाख रुपये, तर शेवगांव तालुक्यातील ७८,६६९ शेतकऱ्यांना १०७ कोटी २५ लाख रुपये मंजूर झाले आहेत. ही रक्कम दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग होणार आहे. महसुल विभागाला



याद्या तत्काळ अपलोड करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून हे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचे आमदार राजळे यांनी सांगितले. राज्य शासनाने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मोठे पॅकेज जाहीर केले असून पुढील टप्प्यात केंद्र शासनाची मदतही मिळणार आहे. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १० हजार रुपयांचे अनुदानही देण्यात येणार आहे.या भरीव आर्थिक सहाय्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, तसेच ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे आमदार मोनिका राजळे यांनी आभार मानले

## राष्ट्रीय चर्मकार महासंघ अहिल्यानगर कार्यकारणी जाहीर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राष्ट्रीय चर्मकार महासंघाची अहिल्यानगर जिल्हा कार्यकारणी राष्ट्रीय अध्यक्ष माजी मंत्री बबनराव घोलप यांनी जाहीर केली असून अहिल्यानगर जिल्हा सचिव पदी माणिक नवसुपे, उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर म्हैसमाळे, तर सहसचिव पदी सिकंदर वाखरे यांची निवड झाली. असून सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे तसेच राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजीराव साळवे व जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे यांच्यासह समाज बांधवांनी त्यांचा सत्कार केला याचबरोबर अण्णासाहेब केदारे यांची तालुकाध्यक्ष अतुल





देव्हारे यांची शहर युवक अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे, माणिक नवसुपे, सिकंदर वाकरे, व ज्ञानेश्वर म्हैसमाळे यांनी गेल्या पंधरा वर्षांपासून अहिल्यानगर चर्मकार समाज वधू वर मंडळाचे उत्कृष्ट काम केले असून समाज बांधवांना एकत्र आणले आहे त्यांच्या या कार्याच्या अनुभवाचा फायदा राष्ट्रीय चर्मकार महासंघाला होणार आहे चर्मकार समाजातील माजी राज्य उपाध्यक्ष राजेंद्र बुंदेले, संतोष उदमले, गणेश गोरे यांनी निवडीबद्दल अभिनंदन केले याचबरोबर आमदार संग्राम जगताप यांनी निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## काकड आरतीच्या स्वरांनी जारकरवाडीत भक्तीमय वातावरण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** उठा जागे व्हा रे आता.. स्मरण करा पंढरीनाथा.. भावे चरणी ठेवा माथा.. चुकवा व्यथा जन्माच्या. अशा पहाटेच्या काकड आरतीच्या मधुर स्वरांनी आंबेगाव तालुक्यातील खेडीपाडी जागी होऊ लागली आहेत. आंबेगाव तालुक्यातील प्रत्येक खेड्यापाड्यात ग्रामदेवतांच्या मंदिरात कोजागिरी पौर्णिमेला काकड आरती महोत्सव सुरू आहे. गावातील भाविक पहाटे चार वाजता स्नान करून मंदिरात हजर होतात. गुलाबी थंडीच्या वातावरणात ही काकड आरती मंजुळ स्वरात सुरू होते, पांडुरंग रुक्मिणीच्या मूर्तीला अभिषेक केला जातो. सुगंधी अगरबत्ती लावतात देवाचे हे मनमोहक रूप पाहून डोळ्यात साठवून ठेवावे असेच असते. भजन मंडळी टिपेच्या स्वरात संत तुकोबाराय संत नामदेवराय संत एकनाथ महाराज यांचे अभंग टाळ विना मृदुंग हार्मोनियमच्या साथीने अळवतात भजनाबरोबरच जीवन जगण्यावर चिंतन करायला लावतात. पहाटेची थंडीतील भजन म्हणून काकड आरती असा शब्द प्रयोग झाला असावा असे ज्येष्ठ वारकरी सांगतात. शेवटी भैरवीने या काकड आरतीची सांगता होते. तालुक्यातील जारकरवाडी येथील पांडुरंग मंदिरात व सर्वच गावात हा काकडा महोत्सव कोजागिरी पौर्णिमेला चालू होतो व त्रिपुरारी पौर्णिमेला संपेल जारकरवाडी येथे विठ्ठल मंदिरात कार्तिक स्नान सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे.

## भूतकाळ विसरून वर्तमान आनंदात जगा:निरज राजगुरु

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

ढोरजळगांव-:काळ असा असतो की आपण काहीच सांगू शकत नाही.भूतकाळातील सुखद क्षण आठवत राहिल्याने मन जड होतं. पण सत्य आणि वस्तुस्थितीचा स्वीकार करून वर्तमानात आनंदी जगणं हाच खरा मार्ग आहे, असे प्रतिपादन उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु यांनी केले. शेवगाव गुरुदत्त सामाजिक संस्थेच्या वतीने येथे आज रविवार (दि.१९ रोजी ) योगतज्ञ प.पू.दादाजी वैशंपायन वृद्धाश्रमातील आजी-आजोबांना साडी चोळी व कपड्यांचे मोफत वाटप उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव फडके, सचिव फुलचंद रोकडे, सुरेश घुले, काकासाहेब लांडे,सुभाष घुगे, निलेश रोकडे, हनुमानप्रसाद जोशी,लक्ष्मण काळे आदी प्रमुख उपस्थित होते.

यावेळी निरज राजगुरु म्हणाले की, या जगात देवांनाही दुःखाचा सामना करावा लागला आहे. आपण तर माणसं आहोत. म्हणून सुख-



दुःखाचा विचार न करता पुढील जीवन आनंदाने व्यतीत करा. या वृध्दाश्रमातील पदाधिकारी आणि येथे राहणारेच आता तुमचे खरे नातेवाईक आहेत,असे समजून पुढे जगा.आम्ही तुमच्या सोबत आहोत.

वृध्दाश्रमात दाखल असलेल्या वृध्दांची अतिशय अस्थेवाईकपणे चौकशी करत राजगुरु यांनी त्यांच्या पूर्व आयुष्याबद्दल जाणून घेतले. त्यांना आपुलकीची जाणीव करुन देत सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. व आरोग्य विषयक काळजी घेण्यासाठी मौलिक सल्ला दिला. त्यांना येणा-या विविध अडचणींबाबत चर्चा करुन आधारकार्ड, आरोग्य व इतर विविध विभागाशी संबंधीत शिबीराचे आयोजन करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

संस्थेच्या वतीने निरज राजगुरु व पोलीस निरीक्षक मुटकुळे यांचा वृध्दाश्रमांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी पोकाँ. बप्पासाहेब धाकतोडे, शाम गुंजाळ, भगवान सानप, सुभाष खिळे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव फडके यांनी तर सुत्रसंचालन माजी प्राचार्य दिलीप फलके यांनी केले.तर निलेश रोकडे यांनी आभार मानले.

# आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या आठवणींनी डोळे पाणावले !

### चिचोंडी शिराळमध्ये सर्वपक्षीय शोकसभा; व्यावसायिकांचा स्वयंस्फूर्त बंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिराळ चिचोंडी :** राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघाचे लोकप्रिय माजी आमदार आणि जनतेचे मोबाईल आमदार म्हणून परिचित असलेले दिवंगत शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर मतदारसंघातील विविध गावांमध्ये सर्वपक्षीय शोकसभा आयोजित केल्या जात आहेत. या सभांमधून कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि हितचिंतकांनी त्यांच्या स्मृतींना उजाळा देत हळहळ व्यक्त केली आहे. पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी शिराळ येथे रविवारी झालेल्या सर्वपक्षीय शोकसभेला कार्यकर्त्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. गावातील सर्व व्यावसायिकांनी कडकडीत बंद पाळत कर्डिले यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. कार्यक्रमादरम्यान बोलताना कार्यकर्त्यांनी सांगितले की, कर्डिले साहेब हे फक्त आमदार नव्हते, तर प्रत्येक कार्यकर्त्याचे कुटुंबीय होते. त्यांनी दिलेला शब्द पाळला, विकासाच्या वचनांवर शिक्कामोर्तब केले, आणि एक कॉल - प्रॉब्लेम सॉल्व या त्यांच्या कार्यशैलीने लोकांच्या मनात वेगळं स्थान निर्माण केलं. गेल्या पंधरा वर्षांपासून राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना त्यांनी जनतेच्या प्रश्नांवर थेट तोडगा काढला. जनतेसाठी त्यांचे कार्यालय नव्हे तर ‘जनता दरबार’ हेच न्यायालय होते ` असं उपस्थितांनी



भावनिक शब्दांत सांगितलं. यावेळी युवानेते अक्षय कर्डिले यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याची एकमताने भूमिका घेण्यात आली. शोकसभेला लक्ष्मण महाराज कराड, भगवान महाराज मचे, गणेश महाराज कुदळे, माजी सभापती संभाजी पालवे, एकनाथ आटकर, वैभव खलाटे, संतोष शिंदे, माजी सैनिक शिवाजीराव पालवे (मेजर), शिवाजी गर्जे (मेजर), पद्माकर आव्हाड, माजी सरपंच बाबाजी पालवे, श्रीकांत आटकर, जनार्धन गीते, रामेश्वर गीते, अंबादास डमाळे, राजेंद्र दगडखैर, भीमराव सोनवणे, उद्धव गीते, दिलीप गीते, रामनाथ शिरसाठ, किशोर पालवे, विठ्ठल गायकवाड, भानुदास डमाळे, आनंदा शिरसाट, पैलवान मिठू मुळे, विजय मोहनराव पालवे, माजी सरपंच महादेव गीते, शर्मा पालवे, बापू गोरे, कमलेश गुगळे, संजय गुगळे, माजी चेअरमन हनुमंत घोरपडे, विष्णू गंडाळ, राजेंद्र गीते, अमोल गवळी, चेअरमन भाऊ आव्हाड, रामदास गोरे, बाबासाहेब कराळे, संदीप दानवे, आबासाहेब गरुड, सुनील गीते, अमोल वाघ, बुढानभाई शेख, बब्बुभाई शेख आदींसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या शोकसभेमुळे चिचोंडी शिराळ आणि परिसरात भावनिक वातावरण निर्माण झाले होते.

# कऱ्हेकाठावर रंगली दिवाळी पहाट...

### सासवडला पत्रकार संघाच्या वतीने दिवाळी पहाटचे आयोजन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** माझी मैना गावाकडं राहिली. चांदणं चांदणं रातीला..काळ्या मातीत मातीत.. एक राधा एक मीरा... लंबी जुदाई.. आली माझ्या घरी ही दिवाळी अशा एका पेक्षा एक सुरेल रचनांनी सासवडचां कऱ्हा काठ भल्या पहाटे दुमदुमून गेला. निमित्त होते पत्रकार संघ सासवड शहरच्या दिवाळी पहाट महोत्सव कार्यक्रमाचे आणि हे सुंदर सादरीकरण केले होते ज्योती शाम गोराणे यांच्या जल्लोष सप्त सुरांचा जागर स्त्री शक्तीचा या कार्यक्रमाने. सुमारे तीन तासांहून अधिक काळ हा संगीत प्रवास रसिकांनी अनुभवत टाळ्यांनी प्रतिसाद दिला. माजी आमदार संजय जगताप, सौ राजवर्धीनी जगताप जिल्हा भाजप अध्यक्ष शेखर वढणे व सौ योगिनी वढणे यांच्या प्रमुख उपस्थितीसह मोठ्या संख्येने रसिकांनी या आनंददायी कार्यक्रमास हजेरी लावली.येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात रविवारी पहाटे आचार्य अत्रे यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून व रंगमंच पुजा करून विजय कोलते, प्रदिप पोमण, हेमंत भोंगळे, विजय वढणे, संजय गणपत जगताप,शेखर वढणे व शाम गोराणे यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. भूपाळी, वासुदेव, गोंधळ, लावणी, भक्ती गीत, हिंदी मराठी चित्रपट गीते व सोबतीला भाग्यश्री राऊत आणि ऋचा पाटील यांची नृत्ये, बाल संबळवादक हर्षल शिंदे याचे वादन कार्यक्रमाची




रंगत वाढवणारे ठरले. ताकतीच्या गायिका ज्योती गोराणे व त्यांच्या समवेत भक्ती कापसे, पुजा वाणी, आरती मीठे यांच्या एका पेक्षा एक सुरेल रचनांनी सासवडचां रसिक तृप्त झाला. शाम गोराणे यांच्या संगीत संयोजनाखाली ढोलकीपटू डॉ वैष्णवी गित्ते, पखवाज वादक ज्ञानेश्वरी क्षीरसागर, की बोर्ड हर्षवर्धन मोरे, पॅड अजय उनवणे , पाटील यांची ध्वनी व्यवस्था व सुनिता निंबाळकर आणि पंकज चव्हाण यांचे निवेदन कार्यक्रमाची उंची वाढवून गेले. कार्यक्रमाच्या मध्यंतरात ज्येष्ठ गायिका ज्योती गोराणे, माजी आमदार संजय जगताप, भाजप जिल्हाअध्यक्ष शेखर वढणे, सासवड शहर अध्यक्ष आनंदभय्या जगताप यांचा शहर पत्रकार संघाच्या वतीने सन्मान करण्यात आला. शेखर वढणे व संजय जगताप यांनी यावेळी उपस्थित रसिकांना मनोगतातून शुभेच्छा दिल्या. संघाचे खजिनदार हेमंत ताकवले यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. अध्यक्ष सुधीर गुरव यांनी प्रास्तविक केले तर सचिव गणेश मुळीक यांनी आभार मानले. याच कार्यक्रमात संघाच्या नवीन कार्यकरणीची घोषणा सुधीर गुरव यांनी केली.

विजय कोलते, हेमंत भोंगळे, प्रदीप पोमण, राजवर्धीनी जगताप, योगिता वढणे, नीता सुभागडे, वसंत ताकवले, नंदकुमार सागर, प्रा संदीप टिळेकर, डॉ संजय रावळ, संजय चव्हाण, नंदूकाका जगताप, ॲड दिलीप निरगुडे, अशपाक बागवान, मंजुश्री निरगुडे, दत्तात्रय काळबेरे, डॉ प्रवीण जगताप, सुमित काकडे, विजय वढणे, संतोष गिरमे, प्रकाश ढवळे, मोहन चव्हाण, माऊली गिरमे, शरद बोबडे, धनंजय साबळे यांसह मोठ्या संख्येने रसिकांनी या आनंददायी कार्यक्रमास हजेरी लावली.गौरव कोलते, जीवन कड, बाळासाहेब कुलकर्णी, राजेंद्र बर्गे, संभाजी महामुनी, नितीन यादव, तानाजी सातव, जगदीश शिंदे, संदीप जगताप, आर्षलांन बागवान, सुनिल वढणे,, मनोज मांढरे या संघाच्या सदस्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले

# आव्हाने बु येथे किराणा दुकानाला आग;१३ लाख रुपयांचे नुकसान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव :-**अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील आव्हाने येथे काल मध्यरात्री अज्ञात समाजकंटकांनी आव्हाने बु ता. शेवगाव येथील राहुल सिताराम कोळगे यांच्या साई गणेश किराणा’ स्टोअर आणि गोडाऊनला पेट्रोल ओतून आग लावल्याची धक्कादायक घटना रविवारी रात्री घडली. ही घटना रात्री सुमारे २ वाजण्याच्या सुमारास घडली व पहाटे ५ वाजेच्या सुमारास नागरिकांच्या निर्दशनास आली.राहुल सचिन व नितीन हे शेतकरी कुटुंबातील होतकरू तरूण शेतीबरोबरच जोडधंदा म्हणून राहुलचे किराणा दुकान आसुन काल पासुन सुरू झालेल्या दिपावली सणानिमित्त दुकानामध्ये जास्त किराणा माल भरून ठेवण्यात आला होता. व रात्री उशिरा पर्यंत दुकान सुरू होते. राहुल कोळगे हे रात्री ११ वा दुकान बंद करून घरी गेल्यावर पाहटेच्या सुमारास संकेत राऊत यांनी भाऊ सचिन कोळगे यांना दुकानाला आग लागल्याचे सांगितले. स्थानिक नागरिकांनी आग लागल्याचे लक्षात येताच ग्रामस्थांनी मोठ्या शर्थिने प्रयत्न करून आग विझवण्यात आली, मात्र तोपर्यंत दुकान व गोडाऊन पुर्णपणे जळून खाक झाले. प्राथमिक अंदाजानुसार सुमारे १३ लाख रुपयांहून अधिक नुकसान झाले असल्याची माहिती मिळाली आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांनी घटनास्थळची माहिती घेतली. त्यांनी सांगितले की, आग लागल्याने मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून नुकसानीचे अचूक मूल्यांकन सुरू आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी डॉग स्कॉड व फॉरेन्सिक लॅबच्या पथकांना घटनास्थळी बोलावण्यात आले आहे. तसेच सीसीटीव्ही फुटेज आणि परिसरातील साक्ष्यांचा तपास सुरू आहे. दीपावली सणाच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील होतकरू तरूण व्यावसायिकाचे किराणा दुकानाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असुन दरम्यान या घटनेमुळे आव्हाणे परिसरात खळबळ उडाली असून अशा विघातक प्रवृत्तीच्या व्यक्तींचा तातडीने तपास लावून त्यांचेवर गुन्हे दाखल करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. गाव बंद ठेवून ग्रामस्थांनी या घटनेचा निषेध केला आहे.राहुल कोळगे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दैनिक
# राष्ट्र सह्याद्री



# कृत्रिम बुद्धिमत्ता स्वीकारणे ही काळाची गरज : खा.शरद पवार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** – तंत्रज्ञानाच्या युगात आपल्यासमोर अनेक नवीन आव्हाने उभी राहत आहेत. या बदलत्या काळाशी जुळवून घेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा स्वीकार करणे ही आजच्या काळाची आवश्यकता आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आज सर्व क्षेत्रांमध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणत आहे. शिक्षण क्षेत्रातही एआयचा उपयोग करून विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक सुलभ, दर्जेदार आणि आधुनिक करण्याचे प्रयत्न रयत शिक्षण संस्थेमार्फत सुरू झाले असल्याचे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खा. शरद पवार यांनी केले.

केडगाव येथील श्री अंबिका प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विज्ञान विद्यालयाच्या नूतन इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी खा. शरद पवार बोलत होते. यावेळी रयत शिक्षण संस्था (सातारा) चे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी खासदार निलेश लंके, विभागीय चेअरमन आशुतोष काळे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती भानुदास कोतकर, पद्मश्री पोपट पवार, ड. भगीरथ शिंदे, डॉ. अनिल पाटील, माजी आ. राहुल जगताप, बाबासाहेब भोस, विकास देशमुख, रयतचे उत्तर विभाग अधिकारी प्राचार्य नवनाथ बोडखे, शिवलिंग मेनकुदळे, राजेंद्र मोरे, बंडू पवार, संजय नागपूरे, तुकाराम कन्हेरकर, डॉ. मेहेरनोश मेहता, जनरल बॉडी सदस्य अभिषेक कळमकर, शिवाजीराव भोर, ज्ञानदेव पांडूळे, अर्जुन पोकळे, अंबादास गारुडकर, हाजी शौकत तांबोळी, आदींसह स्कूल कमिटी व सल्लागार समितीचे सर्व सदस्य, रयत सेवक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पुढे खा. शरद पवार म्हणाले की, कृत्रिम



बुद्धिमत्तेने लोकांच्या जीवनात मोठा बदल घडवला आहे. शेती क्षेत्रातही या तंत्रज्ञानाचा चांगला वापर होऊ शकतो. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. तसेच अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असले तरी, या संकटावर मात करून शेतकऱ्यांनी पुढे जाण्याचे आवाहनही त्यांनी केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी एक मिशन घेऊन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शिक्षणाचा प्रचार-प्रसार केला. यामुळे नवीन पिढी तयार झाली. त्याचा परिणाम अनेक मुले-मुली या वटवृक्षाखाली शिक्षण घेऊन जीवनात यशस्वी झाले. संस्थेचा कारभार विस्तारित करण्यासाठी अनेकांनी योगदान दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभाग अधिकारी प्राचार्य नवनाथ बोडखे यांनी विद्यालयाच्या स्थापनेपासून ते नव्या वास्तूच्या उभारणीपर्यंतचा प्रवास सांगितला. सन १९६९ मध्ये स्थापन झालेल्या या विद्यालयाच्या नवीन इमारतीसाठी ३ कोटी ८१ लाख रुपये खर्च करून सर्व सुविधा असलेले अत्याधुनिक संकुल उभारण्यात आले आहे. कला शिक्षकांनी विद्यालयाचे परिसर सजविण्यात मोलाचे योगदान दिले असून, सर्व देणगीदार व सहकार्य करणाऱ्यांचे त्यांनी आभार मानले.

विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले, तर एआय उपकरणे आणि रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटनही या प्रसंगी करण्यात आले. रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागास संस्थेचा आदर्श विभागीय पुरस्कार मिळाल्याबद्दल आमदार अशितोषजी काळे व प्राचार्य नवनाथ बोडखे यांचा खा. शरद पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी इमारत उभारणीस योगदान देणारे व देणगीदारांचा विशेष सत्कार करण्यात आला.रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी म्हणाले की, या शाळेच्या इमारतीचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले असून, भविष्यात इतर शाळांसाठी हे संकुल एक मॉडेल ठरेल. संस्थेच्या माध्यमातून रोबोटिक, थ्रीडी पेंटिंग, कोडिंग इत्यादी शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जात आहे. हा अभ्यासक्रम इतर संस्था देखील मागत असून, यावरुन संस्थेच्या गुणवत्ता व नवीन शैक्षणिक धोरणाचा केलेला अवलंब लक्षात येत आहे. लवकरच एआरपीद्वारे सर्व काम पेपरलेस करण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याची त्यांनी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब जगदाळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व सेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## कापड दुकानात चोरी

**सोनई** - संभाजीनगर-अहिल्यानगर मार्गालगत असलेल्या घोडेगाव येथील नावाजलेल्या महावीर क्लॉथ सेंटर या कापड दुकानात काल रात्री भीषण चोरी झाली. दुकानाच्या तिसऱ्या मजल्यावर चोरट्यांनी प्रवेश करून भिंतीवरील खिडकीचे गज कापले आणि सुमारे रु. २,६०,००० इतकी रोकड चोरून नेली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. दुकानदार सचिन मदनलाल देसरडा यांच्या तक्रारीवरून सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३८१/२०२५ प्रमाणे कलम ३३१(४), ३०५(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळी शेवगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरू, सोनईचे सपोनि विजय माळी आणि त्यांच्या पथकाने भेट देत तपासाची सूत्रे हाती घेतली आहेत.

# महसूलमंत्री बावनकुळे यांच्याकडून कर्डिले कुटुंबियाचे सांत्वन



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुऱ्हाणनगर येथे आ. स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले.

महसूलमंत्री बावनकुळे यांनी स्व. कर्डिले यांचे सुपुत्र अक्षय कर्डिले, आमदार संग्राम जगताप तसेच कुटुंबातील इतर सदस्यांना धीर देत त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी स्व. शिवाजी कर्डिले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.या प्रसंगी माजी आमदार स्नेहलता कोल्हे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## अतिवृष्टी बाधित ३६ हजार शेतकऱ्यांना ३६ कोटींची मदत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहाता** : सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे राहाता तालुक्यातील शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या नुकसानीपोटी ३६ हजार २८० शेतकऱ्यांना ३६ कोटी ४२ लाख रुपयांची मदत महायुती सरकारने जाहीर केली आहे. जलसंपदा व पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे ही मदत मंजूर करण्यात आली आहे.

तत्कालीन संकट काळात ना. विखे पाटील यांनी स्वतः नुकसानग्रस्त गावांना भेटी देत शेतकऱ्यांशी संवाद साधला होता आणि प्रशासनाला तातडीने पंचनामे करून मदतीचे प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार महसूल व कृषी विभागाच्या संयुक्त पथकांनी राहाता तालुक्यातील ६१ गावांमध्ये झालेल्या नुकसानाचे पंचनामे पूर्ण करून अहवाल शासनाकडे सादर केला होता. या पंचनाम्यांनुसार सुमारे ३२ हजार १६६ हेक्टर शेती क्षेत्राचे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले होते. राज्य शासनाने या नुकसानीची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ बैठकीत ३,२५८ कोटी ५६ लाख रुपयांच्या एकूण मदतीची घोषणा केली होती.यापैकी राहाता तालुक्यासाठी ३६ कोटी ४२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत दिली जाणार आहे. या निर्णयामुळे हजारो शेतकऱ्यांच्या कुटुंबांना दिलासा मिळणार असून, शेतकरी वर्गात समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# शनिशिंगणापूरचे जुने विश्वस्त मंडळ 'आऊट'

## विशेष परवानगी याचिका फेटाळली

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : शनिशिंगणापूर देवस्थानच्या जुन्या तत्कालीन विश्वस्त मंडळाला सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा झटका बसला आहे. कामगारांचे पगार आणि पूजा-सुविधांसाठी दाखल केलेली विशेष परवानगी याचिका सर्वोच्च न्यायालयाने दि. १७ ऑक्टो. रोजी फेटाळली आहे.

या निर्णयामुळे, देवस्थानच्या प्रशासनात पूर्वी हस्तक्षेप करणाऱ्या विश्वस्त मंडळाला स्पष्टपणे बाजूला केले गेले असून, या प्रकरणातील सर्व प्रलंबित अर्जही न्यायालयाने निकाली काढले आहेत.

न्यायमूर्ती विक्रमनाथ आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. महाराष्ट्र सरकारच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्राचा सखोल अभ्यास करून,

**न्यायालयीन लढाई संपली, आता प्रशासनाची जबाबदारी**

या निर्णयामुळे शनिशिंगणापूर देवस्थानचा पुढील कारभार पूर्णपणे सरकारच्या नियोजनानुसार होणार आहे. जुना विश्वस्त मंडळ यापुढे कोणताही दावा करू शकणार नाही.

न्यायालयाने स्पष्ट सांगितले, की, देवस्थानच्या कारभारात हस्तक्षेप करण्याची गरज नाही.या याचिकेत कामगारांचे थकीत पगार, तसेच श्री शनिदेवाच्या सेवा आणि पूजेच्या खर्चासाठी तातडीच्या सवलती मागण्यात आल्या होत्या. पण सर्वोच्च न्यायालयाने सर्व बाजू ऐकून घेत विशेष परवानगी नाकारली. राज्य सरकारने यापूर्वीच या देवस्थानातील अर्थसहाय्य घोटाळ्यांबाबत विधानसभेत आवाज उठवलेला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घोटाळ्यांची यादी सभागृहात सादर केली होती. आष्टीचे आमदार सुरेश धस आणि नेवासाचे आमदार विठ्ठलराव लंघे यांनी घोटाळ्यांची रक्कम हजारो कोटींमध्ये असल्याचा थेट आरोप केला होता.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तर थेट विधान केलं होतं – काहींनी शनिदेवाच्या झोळीत हात घालून लूट केली. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय म्हणजे रुठलेल्या शनिदेवाने अखेर न्याय केला!या निर्णयामुळे देवस्थानच्या अधिकृत, मानधन व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतन संदर्भातील प्रश्न तात्पुरते प्रलंबितच राहिले आहेत. मात्र, सरकारनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चोरमारे यांनी दिलासा देत सांगितले की, सर्व कर्मचाऱ्यांच्या कामाचा आणि हजेरीपत्रकांचा सखोल अभ्यास करून न्याय देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. कोणत्याही कर्मचाऱ्यावर आर्थिक अन्याय होणार नाही.













